॥ श्री ॥

# ४ द्वैतविवेक:

पहिल्या प्रकरणांत सामान्यपणें तत्त्वाचा विचार केला. नंतर शुद्ध व एक अशा ब्रह्मापासून केवळ भ्रमानें उत्पन्न झालेल्या सूक्ष्म व स्थूल भूतांविषयीं विवेचन केलें आणि आतां ह्या व्यक्तरूपानें भासणाऱ्या द्वैताचा विवेक करण्याचें मनांत आणून श्रीविद्यारण्य ईश्वराचें स्मरण करितात; व तें करीत असतांनाच चवथ्या प्रकरणाचा विषय काय आहे तें सुचवितात-

**ईश्वरेणापि जीवेन सृष्टं द्वैतं विविच्यते ।**
**विवेके सति जीवेन हेयो बन्ध: स्फुटीभवेत् ॥१**

**अन्वयार्थ- [ईश्वरेण अपि जीवेन सृष्टं द्वैतं विविच्यते-] ईश्वरानें व जीवानेंहि उत्पन्न केलेल्या द्वैताचें विवेचन केलें जातें [अस्य विवेके सति जीवेन हेय: बंध: स्फुटी भवेत्] या द्वैताचा विवेक झाला कीं, जीवाला त्याज्य असलेला बंध स्पष्ट होईल.**

**प्रकाश:-** मायेला कारणोपाधि व अविद्येला (अंत:करणाला) कार्योपाधि असें म्हणतात. ब्रह्म कारणरूप उपाधीमुळें ईश्वर व कार्यरूप उपाधीमुळें जीव होतें. उपाधियुक्त जीवेश्वर कल्पनेनें सृष्टि उत्पन्न करितात. ईश्वर विलक्षण सामर्थ्यवान् असल्यामुळें त्यानें कल्पनेनें निर्माण केलेल्या सृष्टीला जसें व्यावहारिक सत्यत्व असतें, तसें जीवानें केलेल्या सृष्टीला नसतें. प्राणी ईश्वरकृत सृष्टीनें बद्ध होत नाहीं तर तो स्वत:च्या कल्पनेनेंच बद्ध होतो. यास्तव ईश्वरकृत सृष्टि कोणती व जीवकृत सृष्टी कोणती याचा एकदा पूर्ण निश्चय झाला, कीं विचारवानाला अनर्थातून तात्काल सुटतां येतें. म्हणून या द्वैताचें आम्ही पृथक्करण करितों, अशी स्वामी प्रथमार्धात प्रतिज्ञा करितात. तसेंच हा द्वैतविवेक कावळ्याचे दांतांच्या मीमांसेप्रमाणें निरर्थक नाहीं; तर तो जीवाला बंधनांतून सोडविण्यास अत्यन्त उपयोगी असल्यामुळें फार अवश्य आहे, असेंहि उत्तरार्धात सुचवितात. ॥१॥

-अहो पण पुष्कळ वादी 'अदृष्टांच्या म्ह० पूर्वकर्माच्या द्वारा जीवच जगाचें कारण आहे' असें वर्णन करितात. तेव्हां 'तुम्हीं त्याला ईश्वरानें उत्पन्न केलेलें कसें म्हणतां ? उत्तर -

**मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।**
**स मायी सृजतीत्याहु: श्वेताश्वतरशाखिन: ॥२**

**अन्वयार्थ- [मायां तु प्रकृतिं विद्यात्-] मायेला प्रकृति जाणावें [तथा मायिनं तु महेश्वरं विद्यात्-] व मायावानाला परमेश्वर समजावें. [स मायी सृजति इति श्वेताश्वतरशाखिन: आहु:-] तो मायावी-ईश्वर सृष्टि करितो असें श्वेताश्वतरनामक यजु:शाखेचे अध्यापक सांगतात.**

**प्रकाश:-** मायेमध्यें प्रतिबिंब होणाऱ्या ईश्वराचें प्रकरण चाललें असतां तेथें ही श्रुति प्रवृत्त झाली आहे. माया हीच सृष्टीची प्रकृति व ती माया जो आपल्या स्वाधीन ठेवितो तो ईश्वर असें जाणावें. 'अस्मान्मायी सृजते विश्वमेतत्'(श्वे.)हा मायावी ईश्वरच प्राणीकर्मानुरूप सृष्टि करितो. मायेसह सर्व कार्यकारणसमुदायाचें हा राजाप्रमाणेंच नियमन करीत असल्यामुळें त्याला महेश्वर असें विवेकी मोठ्या आदरानें म्हणतात. ॥२॥

-आतां याच अर्थी असलेलें ऐतरेय उपनिषदाचें पहिलेंच वाक्य येथें अर्थत: घेतात-

**आत्मा वा इदमग्रेऽभूत्स ईक्षत सृजा इति ।**
**संकल्पेनासृजल्लोकान्स एतानिति बह्वृचा: ॥३**

अन्वयार्थ- [अग्रे इदं आत्मा वै अभूत्-] सृष्टीच्या पूर्वीं हें सर्व जगत् आत्माच होतें. [अहं सृजै इति स: ईक्षत-] 'मीं आतां सृष्टि करावी' असें त्यानें

आलोचन केलें. [स एतान् लोकान् संकल्पेन असृजत्-] त्यानें हें सर्व लोक संकल्यानें निर्माण केले. [इति बह्वृचा: आहु:-] असें ऋग्वेदाचें अध्ययन करणारे म्हणतात.

प्रकाश:- पूर्व श्लोकस्थ वाक्याप्रमाणेंच हें ''आत्मा वा इदमेक एवाग्र आसीन्नान्यत्किंचनमिषत्स ईक्षत लोकान्नुसृजा इति०'' (ऐतरेय १-१) वाक्यहि अद्वितीय परमेश्वरच जगत् निर्माण करितो-असें सांगतें.

इदं-या शब्दाची व्याख्या पूर्वी 'एकादशेंद्रियैर्युक्त्याशास्त्रोणापि०' (२-१८) इत्यादि श्लोकांत केलेली आहे ती पाहावी. ह्या सृष्टीच्या पूर्वीचा काल म्हणजे पूर्व सृष्टीचा प्रलयकाल होय हें उघडच आहे. प्रलयकालीं जी सृष्टी सत् संज्ञक आत्मारूपांत लीन झाली होती. तीच प्राण्यांचीं कर्मे फलोन्मुख झालीं असतां आत्म्याच्या इच्छाद्वारा पूर्वीप्रमाणेंच व्यक्त झाली. सृष्टी नामरूपानें व्यवहाराला योग्य झाली कीं ती उत्पन्न झाली असें म्हणतात; व नामरूपांचा सत्स्वरूपांत लय झाल्यामुळें ती व्यवहाराला अयोग्य झाली कीं तिचा प्रलय झाला असें म्हणतात. तात्पर्य सृष्टीचे उत्पत्तिप्रलय तिच्या व्यक्ताव्यक्त होण्यावर अवलंबून आहेत याला 'अव्यक्ताद्व्यक्तय: सर्वा:०' इत्यादि ८-१८ गीतोक्त वचन प्रमाण आहे. ॥३॥

-ईश्वर जगाचें कारण आहे, याविषयीं तैत्तिरीय श्रुतिहि प्रमाण आहे, अशा आशयानें तेथील वाक्याचा अनुवाद करितात-

**खं वाय्वग्निजलोर्व्योषध्यन्नदेहा: क्रमादमी ।**
**संभूता ब्रह्मणस्तस्मादेतस्मादात्मनोऽखिला: ॥४**

अन्वयार्थ- [अमी अखिला: खं वाय्वग्निजलोर्व्योषध्यन्नदेहा:-] हे सर्व-आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी, औषधी, अन्न, देह इत्यादि पदार्थ [तस्मात् एतस्मात् आत्मन: ब्रह्मण: क्रमात् संभूता:-] त्या ह्या आत्मरूप ब्रह्मापासून क्रमानें उत्पन्न झाले. (तै. भा. २-१. पृ. ९७ पहा).

-ज्या अर्थी असा प्रकार आहे-

**बहु स्यामहमेवात: प्रजायेयेति कामत: ।**
**तपस्तप्त्वासृजत्सर्वं जगदित्याह तित्तिरि: ॥५**

अन्वयार्थ- [अहं एव बहु स्यां प्रजायेय इति कामत:-] 'मींच अनेक व्हावें. आधिक्यानें उत्पन्न व्हावें' अशा इच्छेनें [तप: तप्त्वा-] तप-आलोचन करून त्यानें [अत: सर्वं जगत् सृजत् इति तित्तिरि: आह-] यापासून सर्व जगत् निर्माण केलें, असें तित्तिरि सांगतो. -तै. भा. पृ. १३२

प्रकाश:- कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीय अरण्यकांतील ब्रह्मविदोपनिषदांत 'सत्य, ज्ञान व अनंत हें ब्रह्माचें लक्षण आहे,' असें सांगून, पुढें- 'त्याच्यापासून आकाश उत्पन्न झालें; आकाशानें मर्यादित झालेल्या ब्रह्मापासून वायू; तशाच वायुपासून अग्नि; अग्निपासून उदक; उदकापासून पृथ्वी; पृथ्वीपासून ओषधि व वनस्पति; त्यांच्यापासून अन्न व अन्नापासून देह असे पदार्थ उत्पन्न झाले' असें सांगितलें. नंतर त्याला - 'मी आतां बहु व्हावें३ अशी इच्छा झाली. ही इच्छा होतांच त्यानें विचार केला. कारण विचार-ज्ञान-हेंच परमेश्वराचें तप होय. सृष्टीविषयीं विचार करून त्यानें यच्चयावत् जगत् निर्माण केलें, इत्यादि वर्णन केलें आहे. सारांश ह्या श्रुतीवरूनहि ईश्वर संकल्पद्वारा सृष्टि करितो असेंच सिद्ध होतें. ॥४-५॥

-सामवेदाच्या छांदोग्यांतहि ब्रह्मालाच जगत्स्रष्टृत्व सांगितले आहे, असें सांगतात-

**इदमग्रे सदेवासीद्बहुत्वाय तदैक्षत ।**
**तेजोऽवन्नाण्डजादीनि ससर्जेति च सामगा: ॥६**

अन्वयार्थ- [इदं अग्रे सत् एव आसीत्-] हें सर्व पूर्वी सत्च होतें. [तत् बहुत्वाय ऐक्षत-] त्यानें पुष्कळ व्हावें म्हणून आलोचन केलें, [तेजोऽवन्नाण्डजादीनि च ससर्ज-] आणि तेज, जल, पृथ्वी व अंडजादि देह उत्पन्न केले, [इति सामगा:

आहु:-] असें सामवेदी म्हणतात.

**प्रकाश:-** साहाव्या अध्यायांत सद्रूप अद्वितीय ब्रह्माचें प्रतिपादन चाललें असतां, हे पुत्रा, त्या सद्रूप आत्म्यानें ''तदैक्षत बहुस्यां प्रजायेय'' (छां. ६-२) 'आपण आतां बहु व्हावें' असा विचार केला व विचारानंतर तेज, उदक अन्नोपलक्षित पृथ्वी व देहादि उत्पन्न केलें, असें अरुणपुत्र उद्दालकानें आपल्या श्वेतकेतु नामक पुत्राला सांगितलें आहे. सारांश आमचें मत सामवेदालाहि सोडून नाहीं. ॥६॥

-त्याचप्रमाणें-

**विस्फुलिंगा यथा वह्नेर्जायन्तेऽक्षरतस्तथा ।**
**विविधाश्चिज्जडा भावा इत्याथर्वणिका श्रुति: ॥७**

**अन्वयार्थ-** [यथा वह्ने: विस्फुलिंगा: जायन्ते-] ज्याप्रमाणें अग्नीपासून ठिणग्या उत्पन्न होतात [तथा अक्षरत: विविधा: चिज्जडा: भावा: जायन्ते-] त्याचप्रमाणें अक्षरसंज्ञक परमेश्वरापासून नानाप्रकारचे जड व सजीव पदार्थ उत्पन्न होतात; [इति आथर्वणिका श्रुति: आह-] असें अथर्ववेदीय श्रुति सांगते.

**प्रकाश:-** अथर्ववेदाच्या मुंडकोपनिषदांत ''तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिंगा: सहस्रश: प्रभवन्ते सरूपास्तथाक्षराद्विविधा: सोम्यभावा: प्रजायन्ते तत्र चैवापयन्ति'' (मुं. २-१-१) ह्या अर्थाची श्रुति आहे. ह्या श्रुतींत सर्व सृष्टि परमात्म्यापासून निर्माण होते व त्याच्यामध्येंच लीन होते असें स्पष्टपणें सांगितलें आहे. ॥७॥

-बृहदारण्यकामध्येंहि(१-४-७) 'अव्याकृतसंज्ञक ब्रह्मापासून नाम-रूपात्मक जगत् उत्पन्न झालें' असेंच वर्णन आहे, असें सांगतात-

**जगदव्याकृतं पूर्वमासीद्व्याक्रियताधुना ।**
**दृश्याभ्यां नामरूपाभ्यां विराडादिषु ते स्फुटे ॥८**
**विराण्मनुर्नरा-गाव: खराश्वाजावयस्तथा ।**
**पिपीलिकावधि द्वन्द्वमिति वाजसनेयिन: ॥९**

**अन्वयार्थ-** [पूर्वं जगत् अव्याकृतं आसीत्-] पूर्वी जें जगत् अव्यक्त-अस्पष्ट-होतें. [तत् अधुना दृश्याभ्यां नामरूपाभ्यां व्याक्रियत-] तें ईश्वरानें आतां दृश्य-अनुभवास योग्य अशा नाम-रूपांनीं व्यक्त केलें. [ते विराडादिषु स्फुटे वर्तेते-] तीं नामें व रूपें-आकार विराटादि प्राण्यांमध्ये स्पष्टपणें प्रतीत होतात. [कथं-] तीं कशीं म्हणशील तर ऐक- [विराड् मनु: गाव: खराश्वाजावय:-] विराट्, मनु, मनुष्यें, गाई, गर्दभ, अश्व, बकरी, मेंढ्या, [तथा पिपीलिकावधि द्वंद्वं असृजत-] तसेंच, मुंगीपर्यंत सर्व लहानथोर प्राण्यांच्यी जोडपीं त्यानें उत्पन्न केलीं [इति वाजसनेयिन: आहु:-] असें वाजसनेयी शाखाध्यायी सांगतात.

**प्रकाश:-** तात्पर्य आम्हांला सर्व वेदान्त श्रुतींचें पूर्ण पाठबळ असल्यामुळें ह्या वेदबाह्य शुष्कतर्कपटूंना आम्हीं मुळींच जुमानीत नाही; व श्रुतीप्रतिपादित अर्थाचें निर्भयपणें व्याख्यान करितों. ॥८॥९॥

-या सर्व श्रुतींनीं द्वैतसृष्टीचें कथन केल्यावर 'ब्रह्म जीवरूपानें त्यांत प्रविष्ट झालें' असेंहि सांगितलें आहे, असें आतां सांगतात-

**कृत्वा रूपान्तरं जैवं देहे प्राविशदीश्वर: ।**
**इति ता:श्रुतय: प्राहुर्जीवत्वं प्राणधारणात् ॥१०**

**अन्वयार्थ-** [जैवं रूपान्तरं कृत्वा ईश्वर: देहे प्राविशत्-] जीवसंबंधीं असें निराळें रूप करून ईश्वर देहांत प्रविष्ट झाला, [इति ता: श्रुतय: प्राहु:-] असें त्या श्रुती सांगतात. [प्राणधारणात् तस्य जीवत्वं-] प्राणादिकांच्या धारणामुळें त्याला जीवत्व आलें आहे.

**प्रकाश:-** जसें मायेमुळें ब्रह्म ईश्वर होतें, तसेंच तें अज्ञानामुळें जीव होतें. मायोपाधिक ईश्वरानें सर्व सृष्टि निर्माण केली कीं, त्यांत जीवरूपानें तो प्रवेश करितो. भिन्न उपाधींमुळें त्यांचें स्वरूपहि भिन्न झालें आहे. ईश्वर सर्वज्ञ असून जीव किंचिज्ज्ञ आहे. ईश्वराची उपाधि त्याच्या अधीन असल्यामुळें सुखदु:ख, पापपुण्य,

रागद्वेष इत्यादि भाव त्याचे ठिकाणीं नाहींत; व जीवाची उपाधि तदधीन नसल्यामुळें तो स्वत: तिचा (अंत:करण उपाधीचा) अनन्य दास होतो. त्यामुळें त्याला अनेक संकटें व यातना भोगाव्या लागतात. जीव व ईश्वर यांच्यामध्यें एवढाच काय तो भेद आहे. आणि तो सुद्धा उपाधी मुळें झालेला आहे. ब्रह्माचें म्ह० ईश्वराचें रूप अविकारी आहे व जीवरूप पूर्वोक्त कारणांमुळे विकारी आहे. तात्पर्य ईश्वरानें सर्व जग निर्माण केलें अशाविषयींहि जसा अनेक श्रुतींचा आधार दाखवितां येतो, तसाच ईश्वरच जीवरूपानें या द्वैतांत प्रविष्ट झाला आहे, अशाविषयींहि श्रुत्याधार आहे. उदा० ''अनेन जीवेनात्मानुप्रविश्य'' ''स एतमेव सीमानं विदार्थ... तदेवानुप्राविशन्'' इत्यादि. परंतु निर्विकार ब्रह्म सविकार कसें होतें, अशी शंका घेऊं नये. कारण ब्रह्मानें लिंगशरीराशीं तादात्म्य पावणें (तद्रूप होणें) म्हणजेच जीव होणें आहे. जीवु-प्राणधारणे असा पाणिनि मुनीकृत धातुपाठ आहे. त्यावरून सुद्धां जीव्-धातूचा प्राणधारण करणें असा अर्थ आहे हेंच व्यक्त होतें. ॥१०॥

-पण जीवत्व म्हणजे तरी काय ? हें आतां सांगतात-

**चैतन्यं यदधिष्ठानं लिंगदेहश्च य: पुन: ।**
**चिच्छाया लिंगदेहस्था तत्संघो जीव उच्यते ॥११**

**अन्वयार्थ- [यत अधिष्ठानं चैतन्यं-] जें अधिष्ठान चैतन्य, [य: च पुन: लिंगदेह:-] तसेंच जो लिंगदेह [या च लिंगदेहस्था चिच्छाया-] आणि जी लिंगदेहस्थ चैतन्याची छाया [तत्संघ: जीव: इति उच्यते-] यांच्या समुदायाला 'जीव' असें म्हणतात.**

**प्रकाश:-** भ्रमरूप अशा ह्या सर्व देहेंद्रियादि कार्याला चैतन्यच अधिष्ठान आहे. अधिष्ठान म्हणजे आधार. कांहींतरी आधार असल्यावांचून भ्रम होत नाहीं. जग हें भ्रमरूपच आहे; अशाविषयीं पूर्वी थोडासा निर्देश झालेला आहे व पुढेंहि याचें सविस्तर वर्णन होईल. चैतन्यामुळेंच लिंग देहाचें अस्तित्व प्रत्ययाला येतें. यास्तव चैतन्य, लिंगशरीर व त्यांतील चैतन्याचा भास या तिघांच्या समुदायाला 'जीव' असें म्हणतात. चैतन्य नित्य शुद्ध असल्यामुळें जीव नव्हे; लिंगशरीर जड असल्यामुळें जीव नव्हे व लिंगशरीरस्थ चिदाभास त्या दोघांवर अवलंबून असल्यामुळें जीव नव्हे. बरें लिंगशरीर चिदाभास यांनाच जीव म्हणावें तर कारण सोडून केवल कार्याचेंच ग्रहण केल्यासारखें होतें. कार्य कधींहि स्वतंत्र नसतें. तें सर्वदा कारणरूप असतें. या आमच्या म्हणण्यालाहि श्रुति, स्मृति व न्याय यांचा आधार आहे. आम्हाला कांहीं तरी मूळ प्रमाण असल्यावांचून आम्ही कधीं बोलत नसतों. चैतन्य व लिंगशरीर यांना जीव म्हणावें तर तेथें भोक्त्याचें मुळींच भान होत नाहीं. केवल अधिष्ठान व उपाधि यांचा मात्र निर्देश होतो. चैतन्य व चैतन्याभास यांना जीव म्हणावें तर उपाधीलाच टाकिल्यामुळें चैतन्याभासाची सिद्धि होणें कठिण पडतें. सारांश, सर्व दोष लक्षांत आणले कीं, बिंब, उपाधि व प्रतिबिंब यांच्या समुदायाला जीव म्हणावें असें जें स्वामींनीं सांगितलें आहे तेंच अगदीं योग्य आहे; असा निश्चय होतो. ॥११॥

-ईश्वरच जर जीवरूपानें शरीरांत प्रविष्ट झाला आहे तर त्याच्या ठिकाणीं अज्ञत्व, दु:खित्व इत्यादि विरुद्ध धर्म कां दिसतात ? उत्तर-

**माहेश्वरी तु माया या तस्या निर्माणशक्तिवत् ।**
**विद्यते मोहशक्तिश्च तं जीवं मोहयत्यसौ ॥१२**

**अन्वयार्थ- [या तु माहेश्वरी माया-] जी महेश्वराची माया आहे. [तस्या: निर्माणशक्तिवत् मोहशक्ति: च विद्यते-] तिच्या निर्माण शक्ती-प्रमाणेंच मोहशक्तिहि आहे. [असौ तं जीवं मोह-यति-] ती त्या जीवाला मोहित करिते.**

**प्रकाश:-** माया ईश्वराधीन असल्यामुळे तिला ईश्वरी असें म्हणतात. त्या ईश्वरी मायेच्या दोन शक्ति आहेत. एक जगाला निर्माण करणारी व दुसरी जीवाला मोह पाडणारी अशा त्या दोन शक्ति होत. पहिली शक्ति हें

जग निर्माण करिते व दुसरी जिवाला मोह पाडते. असें तदेतज्जडम् मोहात्मकम् (नृसि. उ. ता. ९) श्रुतींत सांगितलें आहे. सदसद्विवेकशून्य होणें हाच मोह होय. या मोहामुळें जीव देहादि असत् पदार्थांनाहि खरें मानूं लागतो व स्वरूपाला विसरतो. ॥१२॥

-त्यामुळें -

**मोहादनीशतां प्राप्य मग्नो वपुषि शोचति ।**
**ईशसृष्टमिदं द्वैतं सर्वमुक्तं समासतः ॥१३**

**अन्वयार्थ- [मोहात् अनीशतां प्राप्य-] मोहामुळें हा परतंत्र-अनीश्वर होऊन [वपुषि मग्नः सन् शोचति-] शरीरांत निमग्न होत्साता-शरीराशीं तादात्म्य पावून शोक करितो. [इदं ईशसृष्टं सर्वं द्वैतं समासतः उक्तम्-] असो; ह्याप्रमाणें हें ईश्वरनिर्मित सर्व द्वैत संक्षेपतः सांगितलें.**

प्रकाशः- "शोचात् मुह्यमानः" (श्वे. ७, मुं. ३-१-२) मायेच्या मोहशक्तीनें मूढ झालेला जीव स्वतःच्या ऐश्वर्यापासून भ्रष्ट होतो. व्यवहारांत एकदा व्यसनी गर्भश्रीमंत पुरुष व्यसनाधीन होऊन अविवेकी बनल्यामुळें स्वतःचें महत्त्व कसें कमी करून घत असतो हें सर्वश्रुत आहेच. यावरून स्वतःचे ऐश्वर्य राखणें किंवा तें परत संपादन करणें ह्या गोष्टी विवेकावर व प्रयत्नावर अवलंबून आहेत असें सहज अनुमान होतें. स्वतःच्या उच्च स्थितीपासून भ्रष्ट होऊन जसा एकादा प्राणी क्षुद्र पदार्थांच्या नादीं लागला असतां परिणामीं अत्यंत दुःखांत पडतो, तसाच हा जीव विवेकशून्य होऊन देहादि असत् पदार्थांशीं संबद्ध झाल्यामुळें जन्मभर रडत बसतो. मी गरीब आहें, मी अविद्वान् आहें, मी दुःखी आहें, माझ्या नशिबीं सुख कसें तें नाहींच; इत्यादि प्रकारें एकसारखी चिंता करीत राहणें हेंच दुःख होय. गीतेंत अशांतस्य कुतः सुखम् म्ह० ज्याचें मन शांत नसतें त्याला सुख कोठलें?- असें सांगितलेंच आहे. सारांश अविवेकजन्य जीवभाव एका विवेकानेंच नष्ट होणे शक्य आहे. असा ह्याप्रमाणें अनेक श्रुतिप्रमाणांनीं ईशकृत द्वैत सिद्ध केलें. ॥१३॥

-आतां जीवानें द्वैत उत्पन्न केलें आहे, याविषयीं प्रमाण काय ? उत्तर-

**सप्तान्नब्राह्मणे द्वैतं जीवसृष्टं प्रपञ्चितम् ।**
**अन्नानि सप्त ज्ञानेन कर्मणाऽजनयत्पिता ॥१४**

**अन्वयार्थ- [पिता सप्त अन्नानि ज्ञानेन कर्मणा अजनयत्-] सर्वं लोकांचा पालक जो समष्टि जीव त्यानें ज्ञान व प्रयत्न यांच्या योगानें सात प्रकारचें अन्न निर्माण केलें; [इति सप्तान्नब्राह्मणे जीवसृष्टं द्वैतं प्रपंचितम् अस्ति-] असें सप्तान्न ब्राह्मणामध्यें जीवनिर्मित द्वैताचें सविस्तर वर्णन केलें आहे.**

प्रकाशः-"यत्सप्तान्नानिमेधया पसाऽजनयत्पिता" (बृ. १-५-१) यांत या जीवकृत सृष्टीचें सविस्तर वर्णन आहे. त्याचाच संक्षेपतः येथें निर्देश केलेला आहे. पिता-पुण्यपापरूप अदृष्टाच्या योगानें सात प्रकारचें अन्न उत्पन्न करणारा जीवांचा समष्टि, लोकपालक जीव ॥१४॥

-पण हें सात प्रकारचें अन्न जीवानें कशाकरितां उत्पन्न केलें ? या प्रश्नाचें श्रुतीनेंच दिलेलें उत्तर -

**मर्त्यान्नमेकं देवान्ने द्वे पश्वन्नं चतुर्थकम् ।**
**अन्यत्त्रितयमात्मार्थमन्नानां विनियोजनम् ॥१५**
**व्रीह्यादिकं दर्शपूर्णमासौ क्षीरं तथा मनः ।**
**वाक्प्राणश्चेति सप्तत्वमन्नानामवगम्यताम् ॥१६**

अन्वयार्थ- [मर्त्यान्नं एकं-] मरणधर्मवान् मनुष्यांकरितां एक, [देवान्ने द्वे-] देवांकरितां दान, [पश्वन्नं चतुर्थकं-] पशूंकरितां चवथें [आत्मार्थं अन्यत् त्रितयं-] व स्वतःकरितां राहिलेलीं तीन. [इति अन्नानां विनियोजनं उक्तम्-] अशा प्रकारें त्या अन्नांचा श्रुतीनेंच विनियोग सांगितलेला आहे.

[व्रीह्यादिकं-] भात-यव-इत्यादि धान्य, [दर्शपूर्णमासौ-] दर्श व पूर्णमास, [क्षीरं-] दूध [तथा मन: वाक् प्राण:च:-] व तसेंच मन, वाणी व प्राण [इति अन्नान्नां सप्तत्वं अवगम्यताम्-] अशीं तीं सात अन्नें होत, असें जाणावें.

प्रकाश:- पंधराव्या व सोळाव्या श्लोकांत अन्नें कोणकोणचीं, कोणा कोणाकरितां व त्यांचीं नांवें काय हें सांगितलें आहे. धान्य हें मनुष्याचें अन्न व दर्श व पूर्णमास हीं दोन देवांचीं अन्नें. मिळून तीन अन्नें झालीं. चवथें दूध. हें पशूंकरितां आहे; व मन, वाणी आणि प्राण हीं तीन स्वत: जीवाची अन्नें आहेत. सारांश ह्याप्रमाणें जीवानें स्वत:च्या संकल्पानें ह्या सात पदार्थांना आपलें अन्न केलें आहे. ह्यालाहि श्रुतींचा असा आधार आहे. पहा- ''एकमस्य साधारणं द्वे देवानभाजयत् त्रीणि आत्मनेऽकुरुत पशुभ्य एकं प्रायच्छत्'' (बृ. १-५) ॥१५॥१६

-'अहो पण ह्या सात अन्नांचा सृष्टींतच अंतर्भाव होतो. त्यामुळें तींहि ईशनिर्मितच आहेत. मग त्यांना तुम्ही जीवनिर्मित कशीं म्हणतां ? उत्तर -

**ईशेन यद्यप्येतानि निर्मितानि स्वरूपत: ।**
**तथापि ज्ञानकर्मभ्यां जीवोऽकार्षीत्तदन्नताम् ॥१७**

**अन्वयार्थ- [यद्यपि ईशेन स्वरूपत: एतानि निर्मितानि-] जरी ईश्वरानें स्वरूपत:-पदार्थरूपानें- हीं निर्मिलीं आहेत [तथापि जीव: ज्ञानकर्मभ्यां तदन्नतां अकार्षीत्-] तरी जीवानें ज्ञान व कर्म यांच्या योगानें त्यांना आपलें अन्न केलें आहे.**

प्रकाश:- यच्चयावत् सर्व पदार्थ ईश्वरानेंच निर्माण केले खरे, पण केवळ त्यांच्या उत्पत्तीनेंच भागत नाहीं. तर त्यांचे पृथक् पृथक् धर्म समजून घेऊन जीवांना त्यांच्यांशीं व्यवहार करावयाचा असतो. ईश्वरानें व्याघ्र, गाय, सर्प, मुंगुस, मनुष्य, पशु, वृक्ष, गवत, दगड, माती इत्यादि अनेक पदार्थ जरी केले आहेत, तरी त्यांतील प्रत्येक दुसऱ्याविषयीं किंवा ते परस्पर निरनिराळी भावना करितो. व्याघ्राला गाय हें आपलें भक्ष्य आहेसें वाटतें व गायीला व्याघ्र हा अति दुष्ट व स्वत:ला भक्षण करणारा एक हिंस्र प्राणी आहे असें वाटतें. तात्पर्य प्रत्येक दुसऱ्या विषयीं, त्याच्या धर्माप्रमाणें (प्रिय, अप्रिय किंवा उपेक्ष्य) भावना करितो. व ही जीवकृत भावना ज्याच्या त्याच्या विहित व प्रतिषिद्ध ज्ञानकर्माप्रमाणें होते. देवतादिकांविषयींचे जें सत् ज्ञान तें विहित व परस्त्री इत्यादिविषयीं जें दुष्ट ज्ञान तें निषिद्ध होय. तसेंच यज्ञादिरूप जें सत् कर्म तें विहित व हिंसादिरूप जें पीडाकर कर्म तें निषिद्ध होय. ''तं विद्याकर्मणी समन्वारभेते पूर्वप्रज्ञाच०-'' प्रत्येक प्राण्याचें ज्ञान, कर्म, व वासना हीं अंत्यकालीं त्याच्या बरोबर जातात, असें बृहदारण्यकांत सांगितलें आहे; व तदनुरूप व्याससूत्रहि आहे ॥१७॥

-अर्थात्-

**ईशकार्यं जीवभोग्यं जगद्द्वाभ्यां समन्वितम् ।**
**पितृजन्या भर्तृभोग्या यथा योषित्तथेष्यताम् ॥१८**

**अन्वयार्थ- [यथा योषित् पितृजन्या भर्तृ-भोग्या-] ज्याप्रमाणें स्त्री ही पित्यापासून होणारी व पतीची भोग्य असते [तथा जगत् ईशकार्यं जीवभोग्यं इति-] त्याप्रमाणें जगत ईशाचें कार्य व जीवाचें भोग्य असें [द्वाभ्यां समन्वितं इति इष्यताम्-] दोन प्रकारें संबद्ध आहे, असें जाणावें.**

प्रकाश:- एकानें पदार्थ निर्माण करावा व दुसऱ्यानें त्याचा उपभोग घ्यावा हें अयोग्य आहे; असें कोणी न्यायी म्हणेल, म्हणून व्यवहारांत सुद्धां पुष्कळ वेळां असाच प्रकार घडतो व त्याला अन्याय असें कोणी म्हणतहि नाहीं; असें येथें दाखविलें आहे. ईश्वर कर्माध्यक्ष (कर्मसाक्षि) असल्यामुळें जीवांना कर्मानुरूप फ़ल मिळावें म्हणून तो जग निर्माण करितो. पण तो स्वत: निष्काम व नित्यतृप्त असल्यामुळें त्याचा

उपभोग घेत नाहीं. जीव हा कर्माच्या अधीन असल्यामुळे पूर्वसंस्कारांप्रमाणें ईशकृत द्वैताचा उपभोग घेऊं लागतो. आणि ह्याप्रमाणें उपभोग घेत असतां त्याच्याविषयीं प्रिय, अप्रिय किंवा उपेक्ष्य भावना करून त्याच्याकडे निरनिराळ्या दृष्टीनें पाहतो. सारांश ईशकृत द्वैत जरी सर्वदा एकरूपानेंच असतें तरी जीव स्वत:च्या समजुतीप्रमाणें त्याला अनेक रूपाचें करितो, ही गोष्ट सिद्ध झाली. ॥१८॥

-जीव व ईश्वर यांच्या जगदुत्पत्तीचें साधन सांगतात-

**मायावृत्त्यात्मको हीशसंकल्प: साधनं जनौ ।**
**मनोवृत्त्यात्मको जीवसंकल्पो भोगसाधनम् ॥१९**

**अन्वयार्थ- [मायावृत्त्यात्मक: ईशसंकल्प:जनौ साधनं हि-] मायेची जी वृत्ति तद्रूप ईश्वरसंकल्प सृष्टीचें साधन आहे [च मनोवृत्त्यात्मक: जीवसंकल्प: भोगसाधनं अस्ति-] व मनोवृत्तिरूप जीवाचा संकल्प भोगाचें साधन आहे.**

प्रकाश:- ईश्वर जगत्कर्ता आहे ही गोष्ट खरी. पण तो कुंभारासारख्या एकाद्या लौकिक कर्त्याप्रमाणें स्वत: जग घडवीत बसत नाहीं. तर प्रलय काल संपून सृष्टीकाल प्राप्त झाला असतां उत्पन्न होणारें जें मायेचें प्रथम स्फुरण (म्ह० स्वसंकल्प) त्याच्या द्वाराच हें निर्माण (व्यक्त) करितो. त्याचप्रमाणें एकादा ईशकृत पदार्थ पाहून त्याविषयीं प्रेम उत्पन्न होणें, तो आपणाला असावा असें वाटणें, त्याच्या स्वरूपादिकांविषयीं अत्यन्त अनुकूल कल्पना करणें इत्यादि ज्या मनोवृत्ति तो जीवाचा संकल्प होय; व ह्या मनोवृत्तीच्या द्वाराच तो सृष्टीला भोग्य करितो. ॥१९॥

-'अहो पण ईश्वरानें उत्पन्न केलेल्या वस्तूच्या स्वरूपाहून निराळें भोग्यस्वरूपच नाहीं. तेव्हां जीव त्याचाच भोग्याकार उत्पन्न करतो असें कसें म्हणतां ?' उत्तर -

**ईशनिर्मितमण्यादौ वस्तुन्येकविधे स्थिते ।**
**भोक्तृधीवृत्तिनानात्वात्तद्भोगो बहुधेष्यते ॥२०**

**अन्वयार्थ- [ईशनिर्मितमण्यादौ वस्तुनि एकविधे स्थिते-] ईश्वरानें निर्माण केलेले जे मणी इत्यादि पदार्थ ते एका रूपानेंच असतांना [भोक्तृधीवृत्तिनानात्वात्-] भोक्त्यांची चित्तवृत्ति नाना प्रकारची असल्यामुळें [तद्भोग: बहुधा इष्यते-] त्यांचा भोग नाना प्रकारें होतो, असें आम्ही मानतों.**

प्रकाश:- भोक्ते जीव नाना प्रकारच्या स्वभावाचे असल्यामुळें ते स्वत:च्या रुचीप्रमाणें भिन्न भिन्न पदार्थांविषयीं भिन्न भिन्न कल्पना करितात. आणि त्यांच्या कल्पनेप्रमाणें ते त्यांना बरेवाईट दिसूं लागतात, असा सर्वांचा अनुभव आहे. यास्तव भोक्त्यांच्या अनेक कल्पनांप्रमाणें पदार्थहि अनेक प्रकारचे बनतात असें आम्ही मानतों. ॥२०॥

-जीव एकाच पदार्थाविषयीं अनेक कल्पना कशा करितो तें दाखवितात-

**हृष्यत्येको मणिं लब्ध्वाक्रुध्यत्यन्यो ह्यलाभत:।**
**पश्यत्येव विरक्तोऽत्र न हृष्यति न कुप्यति ॥२१**

अन्वयार्थ- [एक: मणिं लब्ध्वा हृष्यति-] एक जीव मणि मिळाल्यानें आनंदित होतो, [अन्य: हि अलाभत: क्रुध्यति-] दुसरा त्याची प्राप्ति न झाल्यामुळें रागावतो. [अत्र विरक्त: पश्यति एव-] पण त्या मण्याची इच्छा न करणारा विरक्त त्याला नुसतें पहातो [किंतु न हृष्यति-] पण आनंदित होत नाहीं [न च कुप्यति-] व रागावतहि नाहीं.

प्रकाश:- ईशकृत पदार्थ एकच असतो खरा, पण तो 'आपणाला मिळावा' अशी इच्छा करणाऱ्या दोघांपैकीं ज्याला मिळतो, त्याला आनंद होतो व ज्याला मिळत नाहीं, त्याला दु:ख होतें. पण याविषयीं जो निस्तृष्ण असतो त्याला सुखहि होत

नाहीं; व दु:खहि होत नाहीं; असें आपण नेहमीं पाहतों. अर्थात् तिघां जीवांना एकच पदार्थ तीन प्रकारचा भासतो. हाच प्रकार जगांत सर्व ठिकाणीं चाललेला आहे. आणि त्यामुळेंच मनुष्यांमध्यें अनंत भेद, अनंत आचार, अनंत नियम, अनंत समजुती व अनंत भोग होतात ॥२१॥

-निरनिराळ्या भोगांवरून ज्यांची कल्पना होते ते जीवानें उत्पन्न केलेले आकार कोणते ? उत्तर -

**प्रियोऽप्रिय उपेक्ष्यश्चेत्याकारा मणिगास्त्रय: ।**
**सृष्टा जीवैरीशसृष्टं रूपं साधारणं त्रिषु ॥२२**

अन्वयार्थ- [प्रिय: अप्रिय: उपेक्ष्य: च इति मणिगा: त्रय: आकारा: जीवै: सृष्टा:-] प्रिय, अप्रिय व उपेक्ष्य असे मण्याच्या ठिकाणचें तीन आकार जीवांनीं निर्माण केले. [त्रिषु साधारणं रूपं तु ईशसृष्टम्-] पण ह्या तिन्ही आकारांमध्यें जें साधारण रूप असतें तें ईश्वरनिर्मित होय.

प्रकाश:- ज्याला मणि मिळतो त्याला त्यापासून सुख होत असल्यामुळें तो प्रिय; ज्याला मिळत नाहीं त्याला दु:ख होत असल्यामुळें तो अप्रिय; व ज्याला त्याविषयीं इच्छाच नसते त्याला त्यापासून सुखदु:खादि कांहींच होत नसल्यामुळें उपेक्ष्य[उपेक्षा करण्यासारखा] वाटतो. सारांश प्रिय, अप्रिय व उपेक्ष्य असा हा मण्याचा त्रिविध आकार ईशकृत नसून जीवांच्या संकल्पामुळें होत असतो; असें सिद्ध झालें ॥२२॥

-आणखी एक दृष्टान्त देऊन जीवकृत आकार अधिक स्पष्ट करितात-

**भार्या स्नुषा ननान्दा च याता मातेत्यनेकधा ।**
**प्रतियोगिधिया योषिद्भिद्यते न स्वरूपत: ॥२३**

अन्वयार्थ- [भार्या, स्नुषा, ननान्दा, याता, माता-च-] स्त्री, सून, नणन्द, जाऊ व आई [इति प्रतियोगिधिया योषित् अनेकधा भिद्यते-] इत्यादि प्रकारें एकच स्त्री पति-श्वशूर इत्यादिकांच्या दृष्टीनें अनेकश: भेद पावते. [स्वरूपत: तु न भिद्यते-] पण ती स्वरूपत: भेद पावत नाहीं.

प्रकाश:- स्त्री हा ईशकृत पदार्थ सर्वत्र एकाच स्वरूपाचा असतो. पण पतीच्या दृष्टीनें तो पत्नी, सासऱ्याच्या दृष्टीनें सून, भावजयीच्या दृष्टीनें नणन्द, जावेच्या दृष्टीनें जाऊ व अपत्याच्या दृष्टीनें आई होतो. सारांश ईशनिर्मित एकच पदार्थ, पाहणाऱ्याच्या दृष्टीनें भिन्न भिन्न होतो हें निर्विवाद आहे. ॥२३॥

-'अहो पण एकाच स्त्रीचें भार्या, स्नुषा इत्यादि प्रकारें निरनिराळें ज्ञान जरी झालें तरी त्यामुळें तिच्या स्वरूपांतहि भेद होतो असें दिसत नाहीं' अशी शंका -

**ननु ज्ञानानि भिद्यन्तामाकारस्तु न भिद्यते ।**
**योषिद्वपुष्यतिशयो न दृष्टो जीवनिर्मित: ॥२४**

अन्वयार्थ- [ननु ज्ञानानि भिद्यन्तां आकार: तु न भिद्यते-] अहो ज्ञानें जरी भिन्न भिन्न झालीं तरी आकारांत फरक पडत नाहीं. [यत: योषिद्वपुषि जीवनिर्मित: अतिशय: न दृष्ट:-] कारण स्त्रीच्या शरीरांत जीवानें केलेला फरक कधींच दिसत नाहीं.

प्रकाश:- जीवाच्या संकल्पाप्रमाणें पदार्थाचें भिन्न भिन्न ज्ञान होतें हें खरें; पण त्यामुळें पदार्थाच्या स्वभावसिद्ध आकारांत कांहीं फरक पडत असल्याचें कोठें दिसत नाहीं. हा सर्वहि श्लोक शंकारूप आहे. ॥२४॥

-'ज्ञानाची विलक्षणता ज्ञेयाच्या विलक्षणतेवांचून कधींच संवभत नाहीं. त्यामुळें अशा प्रसंगीं ज्ञेयाच्या आकारांतहि भेद मानावाच लागतो' असें समाधान-

**मैवं मांसमयी योषित्काचिदन्या मनोमयी ।**
**मांसमय्या अभेदेऽपि भिद्यते हि मनोमयी ॥२५**

**अन्वयार्थ- [मा एवं भण-] असें म्हणूं नको. [यत: एका मांसमयी योषित्-] कारण एक मांसाची स्त्री [काचित् अन्या च मनोमयी-] व दुसरी मनोमय-कल्पनेची [मांसमय्या: अभेदे अपि-] मांसाची स्त्री जरी सर्वत्र एकरूपानें असते [मनोमयी भिद्यते हि-] तरी मनोमय स्त्रीमध्यें भेद पडतोच.**

प्रकाश:- मांसमयी-हाडामांसाची एकादश द्वारवती ईश्वरकृत पुतळी; ही व्यवहारांत सर्व ठिकाणीं एकसारखीच जरी दिसते, तरी विषयी पुरुषानें केवळ मनोरथानें केलेली स्त्री अगदीं भिन्न असते. हें सर्वांच्या अनुभवाचें आहे. ॥२५॥

-'भ्रांति, स्वप्न इत्यादि दशेंत बाह्य विषयांचा अभाव असल्यामुळें त्यांतील वस्तु मनोमय असो; पण तोच न्याय जाग्रदवस्थेंतील वस्तूला लावतां येत नाहीं. कारण त्या अवस्थेंत बाह्य पदार्थ असतात,' अशी शंका-

**भ्रान्तिस्वपमनोराज्यस्मृतिष्वस्तु मनोमयम् ।**
**जाग्रन्मानेन मेयस्य न मनोमयतेति चेत् ॥२६**

अन्वयार्थ- [भ्रांति-स्वप्न-मनोराज्य-स्मृतिषु मनोमयं अस्तु-] भ्रम, स्वप्न, मनोराज्य व स्मरण या चार अवस्थांमध्यें पदार्थ मनोमय असूं दे. [किंतु जाग्रन्मानेन मेयस्य मनोमयता न इति चेत्-] पण जाग्रतींतील प्रत्यक्षादि प्रमाणानीं ज्ञात होणाऱ्या पदार्थाला मनोमयता नाहीं, असें जर म्हणशील तर -

प्रकाश:- प्राण्याला जेव्हां भ्रम होतो तेव्हां तो भलभलत्या कल्पना करीत सुटतो. त्याच्या पुढें जरी एकादा घोडा असला तरी तो त्याला बैल दिसतो, दिव्याची एक ज्योत असतां त्याला त्या अनेक दिसतात. तसेंच स्वप्न,मनोराज्य व पूर्वी अनुभविलेल्या पदार्थाचें स्मरण इत्यादि सर्व स्थिति व त्यांतील पदार्थस्फुरण हीं केवल कल्पनामय असल्यामुळें त्यांना जरी मनोमय म्हणतां आलें तरी जाग्रदवस्थेंत साक्षात् भासणारे बाह्य पदार्थहि तसेच आहेत असें कसें म्हणतां? असें जर विचारशील तर त्याचें उत्तर आहे. ॥२६॥

**बाढं माने तु मेयेन योगात्स्याद्विषयाकृति: ।**
**भाष्यवार्तिककाराभ्यामयमर्थ उदीरित: ॥२७**

**अन्वयार्थ- [बाढं-] खरें आहे. त्या अवस्थेंत बाह्य विषय असतो. [तु माने विषयाकृति: तस्य मेयेन योगात् स्यात्-] पण अंत:करणांत जो विषयाकार उत्पन्न होतो तो त्याचा विषयाशीं संयोग झाल्यामुळें होतो. [भाष्यवार्तिककाराभ्यां अयं एव अर्थ: उदीरित:-] भाष्यकार व वार्तिककार यांनीं हेंच सांगितलें आहे.**

प्रकाश:- जाग्रतींत सुद्धां जेव्हां अंत:करणाची वृत्ति इंद्रियद्वारा बाहेर पडून विषयाशीं संयुक्त होते व त्यामुळें त्याच्या सारखीच होते, तेव्हां प्राण्याला विषयांचें ज्ञान होतें. तस्मात् व्यवहारांत अंत:करण विषयाकार झाल्यामुळेंच प्रत्यक्ष ज्ञान होतें; ही गोष्ट सिद्ध झाली. हा सिद्धान्त तरी आम्ही आमच्या पदरचा सांगत आहों असें नाहीं तर भाष्यकार श्रीमत् शंकराचार्य व वार्तिककार श्रीसुरेश्वराचार्य यांनींहि असेंच प्रतिपादन केलें आहे. ॥२७॥

-'भाष्यकारांनीं असें कोठें म्हटलें आहे' म्हणून म्हणाल तर सांगतों-

**मूषासिक्तं यथा ताम्रं तन्निभं जायते तथा ।**
**रुपादीन् व्याप्नुवच्चित्तं तन्निभं दृश्यते ध्रुवम् ॥२८**

अन्वयार्थ- [यथा मूषासिक्तं ताम्रं तन्निभं जायते-] ज्याप्रमाणें मुशींत ओतलेला तांब्याचा रस मुशीसारखा होऊन बाहेर पडतो. [तथा रूपादीन् व्याप्नुवत् चित्तं ध्रुवं तन्निभं दृश्यते-] त्याप्रमाण रूप, रस इत्यादि विषयांना व्यापणारें चित्त नि:संशय त्यांच्यासारखें भासतें.

प्रकाश:- व्यावहारिक लोक धातूंचा रस करून तो मुशींत ओततात व निरनिराळ्या मूर्ति आणि ओंतीव

पदार्थ करितात, हें सर्वप्रसिद्ध आहे. म्हणजे जशी मूस असेल त्याप्रमाणें तो रस आळल्यानंतर होतो. त्याचप्रमाणें हें चित्त रूपादि विषयांना व्यापून स्वत: त्यांच्या आकृतीचें होतें. या श्लोकांत भाष्यकारांनीं तांब्याचाच दृष्टान्त देण्याचें कारण काय ? यावरून भाष्यकारांच्या वेळीं सुवर्णादिकांचे रस करितां येत नव्हते कीं काय ? अशी शंका आधुनिक लोकांना येईल पण ती निरर्थक आहे. कारण दृष्टान्त हा नेहमीं सर्वसाधारण असावा असा नियम आहे. ताम्ररस व त्याचे ओतीव पदार्थ जितके साधारण सर्वप्रसिद्ध असतात तितके सुवर्णादिकांचे रस व पदार्थ नसतात; म्हणून भाष्यकारांनीं उपदेशसाहस्रीसारख्या सर्वसाधारण ग्रंथांत सर्वसाधारण दृष्टान्त योजिला आहे. ॥२८॥

-'अहो पण ताम्रादि धातूंचा अग्निसंपर्कानें रस होतो व तो मुशीमध्यें ओतला असतां थंड होऊन आळतो. मुशीमध्यें जो आकार कोरलेला असतो तोच आकार त्याच्यावर उठतो, हें प्रसिद्ध आहे. पण बुद्धि ताम्रादिकांच्या रसाप्रमाणें मूर्त नसतें. तेव्हां ती विषयांना जरी व्यापीत असली तरी तिला विषयाकार कसा प्राप्त होणार ? उत्तर-

**व्यञ्जको वा यथाऽऽलोको व्यंग्यस्या-**
**कारतामियात्।**
**सर्वार्थव्यंजकत्वाद्धीरर्थाकारा प्रदृश्यते ।।२९**

**अन्वयार्थ- [यथा वा व्यंजक: आलोक: व्यंग्यस्य आकारताम् इयात्-] किंवा ज्याप्रमाणें प्रकाशक उजेड प्रकाश्य पदार्थाच्या आकारत्वास प्राप्त होतो, [तथा धी: सर्वार्थव्यंजकत्वाद् अर्थाकारा प्रदृश्यते-] त्याप्रमाणें बुद्धि सर्व पदार्थांना प्रकाशित करणारी असल्यामुळें, विषयरूप भासते.**

प्रकाश:- अंधकारामध्यें सर्व पदार्थ अंधकाररूप होऊन राहतात. पण त्यांना व्यक्त करणारा जो उजेड तो तसा त्यांच्यासारखा होऊन त्यांना व्यक्त करितो त्याप्रमाणें ही बुद्धि स्वत: विषयांच्या आकाराची होऊन त्यांना भासविते. यच्चयावत् सर्व पदार्थांना व्यक्त करण्याचें सामर्थ्य बुद्धीमध्यें आहे. त्यामुळें इंद्रियांशीं संयुक्त होणाऱ्या पदार्थाशीं संयुक्त होऊन ती तात्काल त्या पदार्थासारखी स्वत: होते; आणि त्यामुळें तो तो पदार्थ भासूं लागतो. प्रकाश 'निराकार आहे' असें तार्किकांना अभिमत असल्यामुळें त्यांच्या दृष्टीनें हा दृष्टान्त योग्य आहे. पण श्रुतीमध्यें प्रकाश मूर्त सत् आहे असेंच वर्णन आहे. ॥२९॥

-आतां वार्तिककारांच्या वचनाचा उल्लेख करितात-

**मातुर्मानाभिनिष्पत्तिर्निष्पन्नं मेयमेति तत् ।**
**मेयाभिसंगतं तच्च मेयाभत्वं प्रपद्यते ।।३०**

**अन्वयार्थ- [मातु: मानाभिनिष्पत्ति: भवति-] प्रमात्यापासून आभासयुक्त अंत:करणाची वृत्ति उत्पन्न होते. [निष्पन्नं तत् मेयं एति-] तें उत्पन्न झालेलें अंत:करणवृत्तिरूप मान विषयास प्राप्त होतें. [तत् च मेयाभिसंगतं मेयाभत्वं प्रपद्यते-] व तें-मान मेयाशीं संबद्ध झालें कीं मेयासारख्या रूपास प्राप्त होतें.**

प्रकाश:- माता म्हणजे अधिष्ठानासह बुद्धिस्थ चिदाभास. अर्थात् जीव. त्याच्यापासून मानाची म्हणजे चिदाभासयुक्त अंत:करणवृत्तीची उत्पत्ती होते; व तें मान मेयापर्यंत येऊन पोंचतें. ह्याप्रमाणें उत्पन्न होणाऱ्या मानाचा मेयांशीं [विषयांशीं] संयोग झाला कीं, तें [मान] हि मेयाच्या आकाराचेंच होतें. सारांश 'जीवाच्या सत्तेमुळें उत्पन्न होणारी अंत:करणवृत्तीच विषयसंयोगानें विषयरूप होते' असें श्रीसुरेश्वराचार्यानाहि अभिमत आहे. ॥३०॥

-याप्रमाणें चित्तच विषयकार होतें असें सप्रमाण सिद्ध झालें असतां, आतां वेदान्तसंमत सिद्धान्त सांगतात-

**सत्येवं विषयौ द्वौ स्तो घटौ मृन्मयधीमयौ ।**
**मृन्मयो मानमेय: स्यात्साक्षिभास्यस्तु धीमय: ।।३१**

अन्वयार्थ- [एवं सति विषयौ द्वौ स्त:-] असें असल्यामुळें विषय दोन होतात. [घटौ मृन्मयधीमयौ वतते-] एक घट मृन्मय व दुसरा धीमय असे दोन घट झाले, [मृन्मय: घट: मानमेय: स्यात्-] मृन्मय घट मानाला गोचर होतो [धीमय: तु साक्षिभास्य: अस्ति-] पण धीमय घट साक्षिगोचर आहे.

प्रकाश:- कोणताहि ज्ञानाला विषय होणारा पदार्थ दोन प्रकारचा असतो. उदाहरणार्थ- आपण मातीचा घट हा पदार्थ घेतल्यास, तोहि एक अंत:करण वृत्तीला विषय होणारा व दुसरा त्या वृत्तीलाहि प्रकाशित करणाऱ्या प्रमात्याला गोचर होणारा असा द्विविध होतो. नेत्रादिद्वारा मातीच्या घटापर्यंत जाऊन वृत्ति घटाकार होते व ह्या वृत्तीला साक्षी [प्रमाता] जाणतो. एकंदरींत पदार्थाचें द्विविधत्व सिद्ध झालें ॥३१॥

-'अहो पण असें दोन प्रकाराचें द्वैत जरी असलें तरी त्यांतील त्याज्य कोणतें हें कळत नाहीं' म्हणून म्हणाल तर सांगतों-

**अन्वयव्यतिरेकाभ्यां धीमयो जीवबन्धकृत् ।**
**सत्यस्मिन् सुखदु:खे स्तस्तस्मिन्नसति न द्वयम् ॥३२**

अन्वयार्थ- [अन्वय-व्यतिरेकाभ्यां धीमय: पदार्थ: जीवबंधकृत् अस्ति-] अन्वय-व्यतिरेक-न्यायानें बुद्धिमय पदार्थ जीवाला बद्ध करणारा आहे, असें निश्चित होतें. [यत: अस्मिन् सति सुखदु:खे स्त:-] कारण हा असला तर सुख-दु:ख होतें. [तस्मिन् तु असति द्वयं अपि न भवति-] पण हा नसला म्हणजे दोन्ही होत नाहींत.

प्रकाश:- कारण असलें तरच कार्य असतें हा अन्वय व कारण नसलें तर कार्य नसतेंच हा व्यतिरेक होय. ह्या न्यायावरून प्रत्येक सिद्धांत निश्चित होतो. हा बुद्धिमय पदार्थ जीवाला बद्ध करितो. कारण हा असला कीं, जीव सुखी, दु:खी होतो; व नसला कीं तो सुखी किंवा दु:खी होत नाहीं. अशी अन्वयव्यतिरेकव्याप्ति व्यवहारांत आपणाला प्रतिदिवशीं दिसते. जाग्रत् व स्वप्न या दोन्ही अवस्थेंत अंत:करण विषयाकार होतें; आणि त्या अवस्थेंतच प्राणी सुखी व दु:खी होतो. निद्रा व समाधि अवस्थेंत अंत:करण सद्रूप होत असल्यामुळें त्याला बाह्य विषयाकार होतांच येत नाहीं. अर्थात् त्याकालीं तो सुखदु:खादि अनर्थांनीं बद्धहि होत नाहीं. सारांश प्राणी मनोमय विषयांनीं बद्ध होतो; हें वेदान्ततत्त्व सिद्ध झालें ॥३२॥

-'अहोपण हा अन्वय-व्यतिरेक न्याय ब्राह्य पदार्थाविषयींच का समजूं नये ? म्ह० घटादि बाह्य पदार्थ असला तर सुख-दु:ख होतें व तो नसला तर तें होत नाहीं, असें कां मानूं नये ?' उत्तर -

**असत्यपि च बाह्यार्थे स्वप्नादौ बध्यते नर: ।**
**समाधिसुप्तिमूर्च्छासु सत्यप्यस्मिन्न बध्यते ॥३३**

अन्वयार्थ- [बाह्यार्थे असति अपि च स्वप्नादौ नर: बध्यते-] बाह्य पदार्थ नसतांना सुद्धां स्वप्नादि अवस्थांमध्यें प्राणी बद्ध होतो; [तथा अस्मिन् सति अपि समाधि-सुप्ति-मूर्च्छासु न बध्यते-] पण तेंच तो असतांनाहि समाधि, सुप्ति-गाढ निद्रा-व मूर्च्छा या अवस्थांत प्राणी बद्ध होत नाहीं.

प्रकाश:- प्राणी स्वप्नामध्यें किंवा स्मृति, मनोरथ इत्यादि कालीं व्याघ्रादिकांपासून दु:ख व भार्यादि इष्ट विषयांपासून सुख अनुभवितो. पण त्याकालीं व्याघ्रादि बाह्य पदार्थ खरोखरी नसतात. तसेंच समाधि, गाढ निद्रा इत्यादि अवस्थेंत जरी व्याघ्रादि सुख दु:ख देणारे पदार्थ अगदीं निकट आले तरी सुखदु:खांनीं तो बद्ध होत नाहीं; असें आपण व्यवहारांत सर्वदा पाहतों. अर्थात् यावरून बाह्य पदार्थांमुळें प्राणी सुखी किंवा दु:खी होतो, हें म्हणणें युक्त नव्हे. तर बुद्धिमय पदार्थांमुळें मात्र तो निश्चयानें बद्ध होतो; असेंच म्हणणें सयुक्तिक आहे. तात्पर्य पूर्वोक्त अन्वयव्यतिरेक बाह्य

विषयाविषयीं नसून मनोमय विषयांविषयींच आहेत असें जाणावें ॥३३॥

-मनोमय प्रपंच बंधक आहे हीच गोष्ट पुन: उदाहरणानें स्पष्ट करितात-

**दूरदेशं गते पुत्रे जीवत्येवात्र तत्पिता ।**
**विप्रलम्भकवाक्येन मृतं मत्वा प्ररोदिति ॥३४**

अन्वयार्थ- [पुत्रे दूरदेशं गते जीवति एव-] पुत्र दूरदेशीं गेला असून तो तेथें जिवंत असतांनाच [अत्र तत्पिता विप्रलंभकवाक्येन-] येथें त्याचा पिता कोणा धूर्ताच्या वाक्यानें [तं मृतं मत्वा प्ररोदिति-] तो मेला असें समजून मोठ्यानें आक्रोश करितो.

प्रकाश:- एकाद्या मनुष्याचा पुत्र कांहीं कामासाठीं परगांवी गेला असतां व तो तेथें सुखरूप असतांहि त्याच्या पित्याला इकडे कोणी लबाड मनुष्यानें 'तुझा पुत्र अमुक अमुक गांवीं गेला होता, पण तो तेथें ज्वरानें मृत झाला' असें जर सांगितलें, तर तो आपला पुत्र खरोखरच मृत झाला आहे असें समजून मोठमोठ्यानें आक्रोश करितो, असा सर्वत्र अनुभव आहे. यावरून प्राणी वस्तुस्थितीनें बद्ध न होतां मन:कल्पनेनें कसा बद्ध होतो हें व्यक्त होतें. ॥३४॥

-पण तेंच त्याच्या उलट पक्षीं पाहूं गेल्यास -

**मृतेऽपि तस्मिन्वार्तायामश्रुतायां न रोदिति ।**
**अत: सर्वस्य जीवस्य बन्धकृन्मानसं जगत् ॥३५**

अन्वयार्थ- [तस्मिन् मृते अपि वार्तायां अश्रुतायां न रोदिति-] तो पुत्र तेथें खरोखर मृत झाला असतांनाहि याला वार्ता न समजल्यास हा रडत नाहीं. [अत: सर्वस्य जीवस्य मानसं जगत् बंधकृत् भवति-] तस्मात् सर्व प्राण्यांना हें मनोमय जगत् बंध उत्पन्न करितें.

प्रकाश:- बरें, तोच पुत्र खरोखर जरी मृत झाला असला, तरी ती दु:खद वार्ता त्याच्या पित्याला कळेपर्यंत तो इकडे मोठ्या आनंदांत असतो. सारांश सर्वहि प्राणी मनोमय सृष्टीनें बद्ध होतात. ईशकृत सृष्टीनें कोणीहि बद्ध होत नाहीं; हा वेदान्तसिद्धान्त त्रिकालाबाधित आहे. ॥३५॥

-'मनोमय द्वैतामुळेंच प्रत्येक जीव बद्ध होतो असें जर मानलें तर बौद्धांच्या विज्ञानवादाचा अंगीकार केल्यासारखें नाहीं का होत ?'' उत्तर ? -

**विज्ञानवादौ बाह्यार्थवैयर्थ्यात्स्यादिहेति चेत् ।**
**न हृद्याकारमाधातुं बाह्यस्यापेक्षितत्वत: ॥३६**

अन्वयार्थ- [बाह्यार्थवैयर्थ्यात् इह विज्ञानवाद: स्यात् इति चेत्-] पण बाह्य पदार्थांना व्यर्थत्व आल्यामुळें या ठिकाणीं विज्ञानवाद प्राप्त होतो, असें जर म्हणाल तर [हृदि आकारं आधातुं अपेक्षितत्वत: न-] अंत:करणांत आकार उत्पन्न होण्यास त्यांची अपेक्षा असल्यामुळें विज्ञानवाद प्राप्त होत नाहीं.

प्रकाश:- मनोमय द्वैतानें जीव बद्ध होतो. बाह्य द्वैतानें तो बद्ध होत नाहीं; असें म्हटलें कीं, बाह्य पदार्थ व्यर्थ आहेत; त्यांचा जीवाच्या सुखदु:खाशीं कांहीं संबंध नाहीं असेंहि म्हणावें लागेल. अर्थात् बौद्धमताचा तुम्ही अंगीकार केलात असें होईल ! असें जें तुमचें म्हणणें आहे तें युक्त नव्हे. कारण, विज्ञानवादी बौद्ध क्षणिक विज्ञानाचा मात्र अंगीकार करितात व बाह्य पदार्थ सर्वथा शून्यरूप आहेत असें प्रतिपादितात. पण आम्ही अखण्ड चैतन्यवादी वृत्तिज्ञानाला विषयकार होण्यास बाह्य विषयांची अत्यन्त आवश्यकता आहेच असें प्रतिपादन करितों. सारांश हा ढळढळीत भेद लक्षांत आणला कीं ह्या वेदान्तदर्शनावर पूर्वोक्त दोष येत नाहीं. ॥३६॥

-'अहो पण अंत:करण विषयाकार होण्यास बाह्य पदार्थांचीच अपेक्षा असें आहे नाहीं. कारण पूर्व पूर्व

मानसिक प्रपंचाच्या संस्कारांनींहि उत्तरोत्तर मानसिक पदार्थ उत्पन्न होणें शक्य आहे' म्हणून म्हणाल तर सांगतों-

**वैयर्थ्यमस्तु वा बाह्यं न वारयितुमीश्महे ।**
**प्रयोजनमपेक्षन्ते न मानानीति हि स्थिति: ।।३७**

अन्वयार्थ- [वा वैयर्थ्यं अस्तु-] किंवा बाह्य द्वैत व्यर्थ कां असेना [वयं बाह्यं वारयितुं न ईश्महे-] आम्ही त्याचें निवारण करण्यास समर्थ नाहीं. [मानानि प्रयोजनं न अपेक्षन्ते इति हि स्थिति:-] प्रमाणें फलाची अपेक्षा करीत नसतात अशी खरी स्थिति आहे.

प्रकाश:- बरें आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें बाह्य पदार्थ व्यर्थ कां असेनातः आम्हांला त्याच्या सार्थकतेशीं किंवा व्यर्थतेशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. बाह्य पदार्थांचें निवारण करण्याचें मात्र आम्हांला धैर्य होत नाहीं. कारण प्रत्यक्षादि सर्वहि प्रमाणें, प्रमेयभूत पदार्थ उपयोगी आहे कीं निरुपयोगी आहे हें पहात बसत नाहींत. तर स्वत:ला विषय होणारा पदार्थ जसा असेल तशीं तीं दाखवीत असतात; अशी खरी वस्तुस्थिति आहे. शिवाय प्रत्येक पदार्थाची सिद्धि प्रमाणावरून होत असते. प्रयोजना (फला) वरून कधींच होत नाहीं; अशीं लौकिक व शास्त्रीयहि समजूत आहे. ।।३७।।

-'मानस द्वैतच जर बंधाचें कारण असेल तर मनोनिरोधानें त्याची निवृत्ति होईल,मग ब्रह्मज्ञानच बंधनिवर्तक आहे असें तुम्ही कां मानता'अशी शंका-

**बन्धश्चेन्मानसद्वैतं तद्धीरोधेन शाम्यति ।**
**अभ्यसेद्योगमेवातो ब्रह्मज्ञानेन किं वद ।।३८**

अन्वयार्थ- [मानसद्वैतं बंध: इति चेत्-] मानसद्वैत हाच जर बंध असेल [तत् धीरोधेन शाम्यति-] तर तें द्वैत, बुद्धीचा निरोध केला असतां शांत होईल. [अत: योगं एव अभ्यसेत्-] यास्तव योगाचाच अभ्यास करावा [ब्रह्मज्ञानेन किं वद-] ब्रह्मज्ञान कशाला पाहिजे ? सांग.

प्रकाश:- मनोमय द्वैतच जर प्राण्याला सुखदु:खद्वारा बद्ध करितें असें मानलें, तर त्या मनोमय द्वैताचा निरोध होणें सुलभ आहे. प्राणायामादि अष्टांग योगाच्या अभ्यासानें बुद्धीचा निरोध झाला असतां, त्याचाहि आपोआप निरोध होईलच ! आणि असें झाल्यावर मग या दुर्लभ ब्रह्मज्ञानाचा काय उपयोग ? कोणीहि झाला तरी इष्टवस्तु प्राप्त होईपर्यंत साधनांची अपेक्षा करीत असतो आणि त्यांतल्या त्यांत सुलभ उपाय कोणता हें पाहण्याकडे त्याची अधिक प्रवृत्ति असते. सारांश सर्वसाधारण व सुलभ अशा योगाभ्यासानेंच काम होत असतांना ब्रह्मज्ञानाचा अंगीकार करण्यांत कांहीं तात्पर्य आहेसें वाटत नाहीं. ।।३८।।

-या शंकेचें समाधान-

**तात्कालिकद्वैतशान्तावप्यागामिजनिक्षय: ।**
**ब्रह्मज्ञानं विना न स्यादिति वेदान्तडिण्डिम: ।।३९**

अन्वयार्थ- [तात्कालिकद्वैतशान्तौ अपि-] योगाभ्यासामुळें तेवढ्या वेळेपुरती द्वैताची शान्ति जरी होत असली, [ब्रह्मज्ञानं विना आगामिजनिक्षय: न स्यात् इति वेदान्तडिण्डिम: अस्ति-] तरी ब्रह्मज्ञानावांचून उत्तरजन्माचा क्षय होत नाहीं, असा वेदान्ताचा घोष आहे, वेदान्त कंठरवानें असें सांगत आहे.

प्रकाश:- दीर्घकालपर्यंत हठयोगाचें अनुष्ठान करून चित्तस्थैर्यलक्षण समाधि सिद्ध झाली असतां, तेवढ्या वेळेपुरतें जरी द्वैत भासलें नाहीं तरी तें समाधीपासून व्युत्थान पावलेल्या साधकाला पुन: जसेंच्या तसेंच भासूं लागतें, त्यामुळें ह्या द्वैतदर्शनास अद्वैतसाक्षात्कार असें म्हणतां येत नाहीं. शिवाय अखण्ड व अद्वैत अशा ब्रह्माचा साक्षात्कार झाल्यावांचून भाविजन्माचा नाश होत नाहीं; असें अनेक श्रुति सांगत आहेत. उदा. 'ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशै:' (श्वे. १-८,२-१-१२) 'ज्ञात्वा शिवं

शान्तिमत्यन्तमेति' (श्वे. ४-१४) 'यदाचर्मवदाकाशं वेष्टयिष्यन्ति मानवा: । तदा देवमविज्ञाय दु:खस्यान्तो भविष्यति ॥' (श्वे. ६-२०) वगैरे. तस्मात् अनर्थाचा सर्वस्वी नाश होण्याकरितां समाध्यादि कष्टकर साधनांच्या मार्गे न लागतां आत्मसाक्षात्कार करून घेण्याच्याच प्रयत्नास लागावें. ॥३९॥

-'पण बाह्य द्वैताचें निवारण केल्यावांचून अद्वैतब्रह्मसाक्षात्कार होणार नाहीं,' असें म्हणाल तर सांगतों-

**अनिवृत्तेऽपीशसृष्टे द्वैते तस्य मृषात्मताम् ।**
**बुद्ध्वा ब्रह्माद्वयं बोद्धुं शक्यं वस्त्वैक्यवादिन: ॥४०**

अन्वयार्थ- [ईशसृष्टे द्वैते अनिवृत्ते अपि-] ईशनिर्मित द्वैताची निवृत्ति जरी न झाली तरी [वस्त्वैक्यवादिन:-] 'वस्तु एक आहे' असें म्हणणाऱ्या अद्वैतवाद्याला [तस्य मृषात्मतां बुद्ध्वा-] तें खोटें आहे असें जाणल्यानेंहि [अद्वयं ब्रह्म बोद्धुं शक्य अस्ति-] अद्वितीय ब्रह्माचें ज्ञान होणें शक्य आहे.

प्रकाश:- ईश्वरानें ज्या सृष्टीस निर्माण केलें तिचा प्राण्यांकडून नाश होणें शक्य नाहीं, हें जरी खरें आहे, तरी विचारानें तिचें खरें स्वरूप समजणें शक्य आहे. आणि त्यामुळें या जगांत स्थूलदृष्टि पुरुषाला जरी अनेक पदार्थ दिसत असले तरी विचारवानाला कार्यकारणानन्यत्वहि (म्ह.) कारणाहून कार्याचा अभाव, या न्यायानें हें कार्यरूप जग खोटें आहे असें समजल्यानंतर अद्वय ब्रह्माचा साक्षात्कार होणें सुलभ आहे. हा सर्व प्रपंच प्राण्यांच्या दृष्टीना प्रतिबंध करीत असल्यामुळें त्यांना त्याचें बीज व तत्त्व समजत नाहीं. पण एकदा एकाद्या भाग्यवानाला सर्वान्तर पाहण्याची युक्ति समजली, कीं मग तो या सर्वांच्याहि पलीकडे काय हें सहज पाहतो; व नंतर त्याला ह्या आकाराचें कांहींच महत्त्व वाटेनासें होतें. सारांश बाह्य द्वैताची निवृत्ति जरी न झाली तरी तें मिथ्या आहे एवढेंच निश्चयपूर्वक समजल्यानेंहि ब्रह्मज्ञान होऊं शकतें. ॥४०॥

-'द्वैत मिथ्या आहे' हें ज्ञान अद्वैतज्ञानाचें निमित्त नव्हे, तर द्वैताचें निवारणच त्याचें निमित्त आहे, असा आग्रह धरणाऱ्या वाद्यास सिद्धान्ती म्हणतात-

**प्रलये तन्निवृत्तौ तु गुरुशास्त्राद्यभावत: ।**
**विरोधिद्वैताभावेऽपि न शक्यं बोद्धुमद्वयम् ॥४१**

अन्वयार्थ- [प्रलये तन्निवृत्तौ तु-] प्रलयावस्थेमध्यें त्या द्वैताची निवृत्ति झाल्यावर [विरोधिद्वैताभावे अपि-] विरोधि द्वैताचा जरी अभाव होत असला तरी [गुरुशास्त्राद्यभावत; अद्वयं बोद्धुं न शक्यम्-] गुरु, शास्त्र इत्यादि ज्ञानसाधनांचा त्यावेळीं अभाव असल्यामुळें अद्वितीय ब्रह्माचें ज्ञान होऊं शकत नाहीं.

प्रकाश:- द्वैताचें सर्वथैव निवारण झाल्यावांचून ब्रह्मज्ञान होणारच नाहीं असें जर मानिलें तर निद्रावस्था, प्रलयकाल इत्यादि कालीं द्वैताचें मुळींच भान होत नसल्यामुळें त्याकालीं ब्रह्मसाक्षात्कार व्हावयास पाहिजे. कारण प्रलयकालाचा जरी आम्हां किंचिज्ञांना अनुभव नसला तरी निद्रावस्थेचा अनुभव सर्वांस असतो, व त्या काली सर्व प्रपंचाचा उच्छेद कसा होतो हें सर्वांना माहित असतें.पण आत्म-साक्षात्कार होत असल्याचें कोणाला ठाऊक नाहीं. बरें, त्या वेळीं आत्मसाक्षात्कार होत असूनहि तो जीवांना भासत नाहीं असें जर म्हणावें तर त्याचें फल जो अपुनरावृत्ति- [पुन: अध्यास न होणे] रूप-मोक्ष. त्याची प्राप्ति कां होत नाहीं ? शिवाय आत्मसाक्षात्काराला गुरु व शास्त्रें यांची अत्यन्त आवश्यकता असते असें वेदान्तांत ठिकठिकाणीं सांगितलेलें असतें. व निद्रादि अवस्थेंत तर याचा अभावच असतो. मग साधनावांचून साध्याची प्राप्ति कशी होणार ? तस्मात् द्वैतनिवृत्ति हेंच ज्ञानसाधन नसून तें मृषा आहे असें निश्चयानें समजणें हें ज्ञानसाधन

आहे असें पूर्वोक्तच सिद्ध झालें ॥४१॥

-'पण द्वैत असतांना अद्वैतसाक्षात्कार कसा होणार ?' उत्तर -

**अबाधकं साधकं च द्वैतमीश्वरनिर्मितम् ।**
**अपनेतुमशक्यं चेत्यास्तां तद्द्विष्यते कुतः ॥४२**

अन्वयार्थ- [ईश्वरनिर्मितं द्वैत अबाधकं साधकं च अपनेतुं अशक्यं-] हें ईशनिर्मित द्वैत अद्वैतज्ञानाला बाध न करणारें, त्याची सिद्धि करून देणारें व निवारण करावयास अशक्य असें आहे [इति हेतोः तत् आस्तां-] यास्तव तें असेना ! [कुतः द्विष्यते-] त्याचा द्वेष कां करितां ?

प्रकाशः- ईश्वराची कृति कोणालाहि प्रतिकूल नसते. तुला जी ह्या तत्कृत द्वैताची भीति वाटत आहे ती व्यर्थ आहे. कारण तें आत्मसाक्षात्काराला कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध करीत नसून, उलट गुरु, शास्त्र इत्यादि रूपानें त्याला अत्यन्त साह्य करीत असतें. अधिकारी पुरुषाला हें सर्व खोटें आहे असें समजल्यानेंच कृतार्थ होतां येत असतांना त्याचा नाश व्हावा अशी दुष्ट बुद्धि ठेवण्यांत काय अर्थ आहे ? बरें आम्ही परतंत्र प्राण्यांनीं 'त्याचा नाश व्हावा' अशी कितीहि जरी दृढ इच्छा केली तरी त्यापासून काय होणार आहे ? ईशकृतीला अन्यथा करण्याचें आमचें सामर्थ्य नाहीं; हें उघड आहे. मग उगीच आपण त्याचा द्वेष कां करावा ? असेना कां तें बिचारें ? त्याच्यापासून आपली काय हानि आहे ? तात्पर्य अशक्य प्रकार घडवून आणण्याची हांव धरण्यापेक्षां आपल्या आटोक्यांत असेल तेवढेंच करण्याची इच्छा ठेवणें अधिक शहाणपणाचें असल्यामुळें द्वैत त्रिकालसत्य नव्हे अशी भावना करावी हेंच सर्वोत्तम होय. ॥४२॥

-आतां जीवकृत द्वैताचा शास्त्रीय व अशास्त्रीय असा विभाग व त्यांतील ग्राह्य कोणतें व अग्राह्य कोणतें, तेंहि सांगतात-

**जीवद्वैतं तु शास्त्रीयमशास्त्रीयमिति द्विधा ।**
**उपाददीत शास्त्रीयमातत्त्वस्यावबोधनात् ॥४३**

अन्वयार्थ- [जीवद्वैतं तु शास्त्रीयं अशास्त्रीयं च इति द्विधा अस्ति-] पण जीवद्वैत शास्त्रीय व अशास्त्रीय असें दोन प्रकारचें आहे. मग तें दोन्ही प्रकारचें जीवद्वैत सर्वदा त्याज्यच आहे कीं काय ? उत्तर - [आतत्त्वस्य अवबोधनात् शास्त्रीयं उपाददीत-] तत्त्वाचा साक्षात्कार होईपर्यंत शास्त्रीय द्वैताचा अंगीकार करावा.

प्रकाशः- ईश्वरानें निर्माण केलेल्या द्वैतांत जसा कांहीं-शास्त्र, गुरु इत्यादि प्रकारचा भाग हितकर व कांहीं-स्त्री, वित्त इत्यादि प्रकारचा अनर्थक असतो, तसाच हा जीवकृत प्रपंचहि शास्त्रीय व अशास्त्रीय असा दोन प्रकारचा आहे. त्यांतील प्रथम हितकर असून द्वितीय अहितकर आहे. शिवाय जीवकृत शास्त्रीय द्वैत तत्त्वज्ञानाला अत्यन्त उपयोगीं असतें. यास्तव 'माझा आत्माच ब्रह्म आहे' असा साक्षात्कार होईपर्यंत त्याचा आदरपूर्वक स्वीकार करावा. ॥४३॥

-आतां जीवकृत शास्त्रीय द्वैत कोणतें तें सांगतात-

**आत्मब्रह्मविचाराख्यं शास्त्रीयं मानसं जगत् ।**
**बुद्धे तत्त्वे तच्च हेयमिति श्रुत्यनुशासनम् ॥४४**

अन्वयार्थ- [यत् आत्मब्रह्मविचाराख्यं-] 'आत्मरूप ब्रह्माचा विचार' या नांवाचें जें जीवकृत श्रवणादिक [तत् शास्त्रीयं मानसं जगत्-] तें शास्त्रीय मनोमय जगत् होय. [तत् च तत्त्वे बुद्धे सति हेयं-] तत्त्वाचा साक्षात्कार झाला असतां त्याचा त्याग करावा. [इति श्रुन्यनुशासनम्-] असा श्रुतीचा उपदेश आहे.

प्रकाशः- प्रत्येक प्राण्याचा आत्मा ब्रह्मच आहे असें ज्याच्यामुळें निश्चयानें समजतें तें शास्त्रीय द्वैत होय.

गुरुमुखानें ब्रह्मविद्याप्रतिपादक ग्रंथांचें श्रवण करणें, श्रवणानें निश्चित केलेल्या अर्थाचें वारंवार मनन करणें व मननरूप युक्तीनें श्रुत अर्थाविषयीं उत्पन्न होणाऱ्या संशयांचें निराकरण केल्यानंतर त्याच तत्त्वाचें सतत ध्यान करीत राहणें हें त्या (शास्त्रीय द्वैता-) चें लक्षण आहे. यास्तव, प्रत्येक साधकानें तत्त्वज्ञान होईतोंच त्याचा स्वीकार करून तें झालें असतां त्याचाहि त्याग करावा. कारण आत्मसाक्षात्काररूपी परम पुरुषार्थाची प्राप्ति झाली असतां, त्याच्या साधनांचा पुन: लोभानें स्वीकार करण्यांत कांहींएक अर्थ नसतो. ह्याविषयीं हीं वचनें लक्ष्यांत ठेवावींत. "आसुप्तेरा मृते: कालं नयेद्वेदान्तचिन्तया ।" "दद्यान्नावसरं किंश्चित्कामादीनां मनागपि ।"

**शंका:-** मग 'गाढ निद्रा लागेपर्यंत किंवा मरण येईपर्यंत मनुष्यानें आपला काल वेदान्तचिन्तनांत घालवावा' असें जें श्रुतिवचन आहे, त्याला या तुमच्या म्हणण्यानें बाध नाहीं का येत ? **समाधान:-** नाहीं. कारण तूं जी श्रुति सांगितलीस तिचाच उत्तरार्ध 'कामादिक वृत्तींना यत्किंश्चित्‌हि अवकाश देऊं नये' अशा अर्थाचा असल्यामुळें पूर्ववाक्यानें उत्तर वाक्योक्त कामादिकांचाच निषेध केला आहे असें स्पष्ट होतें. तस्मात् आत्मसाक्षात्कारानें तृप्त झालेल्या पुरुषानें सर्व लौकिक व वैदिक साधनांचा त्याग करावा. ॥४४॥

-तत्त्वज्ञान झाल्यावर शास्त्रीय द्वैताचाहि त्याग करावा, असें प्रतिपादन करणाऱ्या श्रुतींचा उल्लेख करितात-

**शास्त्राण्यधीत्य मेधावी अभ्यस्य च पुन: पुन: ।**
**परमं ब्रह्म विज्ञाय उल्कावत्तान्यथोत्सृजेत् ॥४५**

**अन्वयार्थ-** [मेधावी शास्त्राणि अधीत्य-] बुद्धिमानानें शास्त्रांचें अध्यन करून; [च पुन: पुन: अभ्यस्य-] व पुन: पुन: त्यांची आवृत्ति करून[परमं ब्रह्म विज्ञाय-] परब्रह्माला साक्षात् जाणून [अथ तानि उल्कावत् उत्सृजेत्-] त्यानतर मशालीप्रमाणें त्याचा त्याग करावा. (अमृतबिंदूपनिषद् १.)

**प्रकाश:-** अमृतबिंदूपनिषदामध्यें या अर्थाची श्रुति आहे. स्वत:चें कल्याण व्हावें अशी इच्छा करणाऱ्या पुरुषानें प्रथमत: अद्वैतप्रतिपादक शास्त्रांचें पूर्ण अध्ययन करावें. नंतर त्यांतील अर्थाविषयीं पुन: पुन: विचार करावा. कारण विचारानें अनिश्चित व संशयित पदार्थज्ञानहि निश्चित होतें असा सर्वांचा अनुभव आहे. या पूर्वोक्त दोन साधनांचें पूर्णपणें अनुष्ठान केलें, कीं साधकाची चित्तशुद्धि होऊन त्याला परब्रह्माचा साक्षात्कार होतो. हा साक्षात्कार म्हणजेच आत्मज्ञानरूप व त्रिविध दु:खशून्यलक्षण मोक्ष असल्यामुळें त्याला त्याच्या प्राप्तीनंतर कोणत्याहि साधनाची गरज राहत नाहीं. म्हणून ज्याप्रमाणें एकादा वाटसरु इष्टग्रामाला जाऊन पोंचला असतां अंधकाराचें निवारण करण्याकरितां हातांत घेतलेली चूड (किंवा दीपज्योति) टाकितो त्याप्रमाणें ह्या इष्ट लाभानें निरिच्छ झालेल्या आत्मज्ञानीं पंडितानें सर्व साधनांचा त्याग करावा. ॥४५॥

-तसेंच-

**ग्रन्थमभ्यस्य मेधावी ज्ञानविज्ञानतत्पर: ।**
**पलालमिव धान्यार्थी त्यजेद्ग्रन्थमशेषत: ॥४६**

**अन्वयार्थ- [मेधावी ज्ञानविज्ञानतत्पर: सन्-] आपलें परम हित इच्छिणाऱ्या पुरुषानें परोक्ष व अपरोक्ष ज्ञानामध्यें तत्पर होऊन [ग्रन्थं अभ्यस्य-] ग्रंथाचा अभ्यास करून [धान्यार्थी पलालं इव-] नंतर धान्याची इच्छा करणारा जसें तुष टाकून देतो त्याचप्रमाणें त्यानें [ग्रन्थं अशेषत: त्यजेत्-] ग्रंथाचा नि:शेष त्याग करावा. (ब्रह्मबिंदूपनिषद् १८)**

**प्रकाश:-** असेंच सांगितलें आहे कीं व्यवहारांत परिणामाकडे दृष्टि पोंचवून पूर्वींपासूनच सावध राहणाऱ्याला शहाणा, चतुर असें म्हणत असतात. या

श्लोकांतील मेधावी या शब्दाचा अर्थहि असाच आहे. कारण ईश्वरेच्छेनें प्रस्तुत प्राप्त झालेल्या बऱ्यावाईट स्थितींतच गर्क होऊन न राहतां 'पुढें आपलें अखण्ड कल्याण कसें होईल' असा विचार करणारा पुरुष कोठें एकादाच आढळतो. **ज्ञानविज्ञानतत्परः-** ज्ञान म्हणजे शास्त्रीय किंवा परोक्ष ज्ञान व विज्ञान म्हणजे अनुभवसिद्ध किंवा प्रत्यक्ष (साक्षात्) ज्ञान. या उभय ज्ञानांविषयीं अत्यंत उत्सुक होऊन अद्वैतमतप्रतिपादक ग्रंथाचा अभ्यास करावा; व इष्ट हेतु साध्य झाल्यावर धान्याच्या कणांचीच आशा करणारा जसा वरील तुष फेंकून देतो, त्याप्रमाणें यानेंहि त्या जड अक्षरांचा त्याग करावा. पूर्वींप्रमाणें त्यांची आवृत्ति वगैरे करीत बसण्यांत कालक्षेप करून स्वात्मानंदानुभवाला मुकूं नये. ॥४६॥

-अशा अर्थाची बृहदारण्यक श्रुति आहे -

**तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः ।**
**नानुध्यायाद्बहूञ्शब्दान् वाचो विग्लापनं हि तत् ॥४७**

अन्वयार्थ- [धीरः ब्राह्मणः तं एव विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत-] धीर ब्राह्मणानें त्या अद्वितीय आत्म्याचा साक्षात्कार करून घेतल्यानंतर तद्विषयकच अनुसंधान ठेवावें. [बहून् शब्दान् न अनुध्यायात्-] मग आणखी अधिक शब्दांचें चिंतन किंवा उच्चारण करूं नये. [हि तत् वाचः विग्लापनं भवति-] कारण तें वाणीला शिणविणारें आहे. (बृ. भा. ४.४.२१.)

प्रकाशः- **धीर**-सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या विषयांना तुच्छ मानून जो सर्वहि इंद्रियांचें पूर्णपणें नियमन करितो तो धीर होय, असें वेदान्तमत आहे. **प्रज्ञा**-ब्रह्म व आत्मा यांचें ऐक्य आहे-अशी सतत व दृढ भावना. **नानुध्याया०**- अर्थादिकांकडे फारसें लक्ष्य न देतां व श्रद्धेवांचून भराभर ग्रंथ वाचण्यांत कांहींएक लाभ नसून उलट एकप्रकारें हानीच आहे असें येथें सुचविलें आहे. ''तमेकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुञ्चथ'' (मुं. २.२.५) ही श्रुति प्रमाण आहे. ॥४७॥

-तसेंच-

**तमेवैकं विजानीय ह्यन्या वाचो विमुञ्चथ ।**
**यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञ इत्याद्याः श्रुतयः स्फुटाः ॥४८**

अन्वयार्थ- [तं एव एकं विजानीथ-] त्याच एका नित्य शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव आत्म्याला जाणा. [हि अन्याः वाचः विमुञ्चथ-] व अन्य सर्व वाणी सोडा. मुं. भा. २.२.५ [प्राज्ञः वाक् मनसि यच्छेत्-] मुमुक्षूनें वाणीचें मनांत संयमन करावें- का. भा. ३.१ [इत्याद्याः श्रुतयः स्फुटाः सन्ति-] इत्यादि अनेक श्रुति हीच गोष्ट अगदीं स्पष्टपणें सांगत आहे.

प्रकाशः- **तात्पर्य**- उत्तम साधकानें सर्वदा आत्म्याचें चिन्तन करीत राहून अन्य सर्व व्यापार टाकावे. अशाच प्रकारच्या आणखी अनेक श्रुति आहेत. पण ग्रंथकारांनीं विस्तारभयानें त्यांचा येथें उल्लेख केला नाहीं. ॥४८॥

-उत्तम साधकानें सर्वदा आत्म्याचेंच चिन्तन करीत राहून अन्य सर्व व्यापार टाकावे. आत्मज्ञान झाल्यावर साधनांचा त्याग करावा. असेंच सर्व श्रुति सांगतात. आतां अशास्त्रीय द्वैताचे अवान्तरभेद सांगतात-

**अशास्त्रीयमपि द्वैतं तीव्रं मन्दमिति द्विधा ।**
**कामक्रोधादिकं तीव्र मनोराज्यं तथेतरत् ॥४९**

अन्वयार्थ- [अशास्त्रीयं द्वैतं अपि तीव्रं मन्दं च इति द्विधा अस्ति-] अशास्त्रीय द्वैत सुद्धां तीव्र व मंद असें दोन प्रकारचें आहे. [कामक्रोधादिकं तीव्रं-] कामक्रोधादिक हें तीव्र असून [तथा मनोराज्यं इतरत्-] मनोराज्य हें मन्द अशास्त्रीय द्वैत आहे.

प्रकाश:- अशास्त्रीय म्हणजे शास्त्रबाह्य किंवा शास्त्रानें निषिद्ध मानिलेलें. ज्याचा परिणाम तात्काल होतो तें तीव्र व ज्याचा परिणाम उशीरानें होतो किंवा होतहि नाहीं; तें जीवनिर्मित मन्द अशास्त्रीय द्वैत होय. काम, क्रोध, लोभ इत्यादि दुष्ट वृत्तीचा या जगांत अति अनिष्ट परिणाम तात्काल होत असल्यामुळे त्याला तीव्र व मनोराज्यासारख्या अल्प अनर्थकर वृत्तींना मन्द द्वैत असें म्हणत असतात. ॥४९॥

- मग हें द्विविध अशास्त्रीय द्वैतहि शास्त्रीय द्वैताप्रमाणेंच तत्त्वज्ञानानंतर सोडावयाचें कीं काय ? उत्तर-

**उभयं तत्त्वबोधात् प्राङ्निवार्यं बोधसिद्धये ।**
**शम: समाहितत्वं साधनेषु श्रुतं यत: ॥५०**

अन्वयार्थ- [यत: शम: समाहितत्वं च साधनेषु श्रुतं-] ज्याअर्थी शम व समाधान यांचा साधनांमध्यें निर्देश केलेला आहे, [तत: बोधसिद्धये-] त्याअर्थी आत्मसाक्षात्कार व्हावा म्हणून [तत्त्वबोधात्प्राक् उभयं निवार्यम्-]. तत्त्वबोधाची सिद्धि होईतों त्या दोन्ही प्रकारच्या अशास्त्रीय द्वैताचें निवारण करावें.

प्रकाश:-'शांत, दान्त, उपरतियुक्त, तितिक्षावान् व समाधानसंपन्न होऊन साधकानें आपल्या बुद्धीमध्येंच आत्म्याला शोधावें' अशी कण्वश्रुति आहे. त्यावरून शान्ति व समाधान हीं दोन साक्षात्काराचीं साधनेंच आहेत असें निश्चित होतें. आणि त्यामुळें कामक्रोधादिक तीव्र व मनोरज्यासारख्या मंद द्वैताचें बोध होईतों प्रयत्नपूर्वक निवारण करावें; आणि तसें न केल्यास पूर्वोक्त साधनांनीं पूर्णपणें संपन्न न झाल्यामुळें आत्मसाक्षात्कार होणार नाहीं. असेंहि अर्थातच सिद्ध झालें. ॥५०॥

-तर मग तत्त्वज्ञानानंतर कामादि द्वैताचा स्वीकार करण्यास हकरत नाहीं, म्हणून म्हणाल तर सांगतों -

**बोधादूर्ध्वं च तद्धेयं जीवन्मुक्तिप्रसिद्धये ।**
**कामादिक्लेशबन्धेन युक्तस्य न हि मुक्तता ॥५१**

अन्वयार्थ- [बोधात् ऊर्ध्वं च जीवन्मुक्तिप्रसिद्धये तत् हेयं-] बोधानंतर जीवन्मुक्तीची सिद्धि होण्याकरितां तें द्वैत त्याज्य आहे. [यत: कामादिक्लेशबन्धेन युक्तस्य मुक्तता न हि-] कारण कामादि क्लेशरूप बंधानें युक्त असणाराला मुक्तता कधींच प्राप्त होत नाहीं.

प्रकाश:- बोध होण्यापूर्वीं तो व्हावा या आशेनें कामादिकांचा अव्हेर करावा व तो झाल्यावर जीवन्मुक्ति सिद्ध व्हावी म्हणून त्यांचा त्याग करावा असें आमचें म्हणणें आहे. कारण कामादि हे साधकाचे सर्वदा शत्रूच होत. शिवाय कामादिकांच्या योगानें प्राण्याला जे क्लेश होत असतात तोच बंध असल्यामुळें त्याचा ध्वंस झाल्यावांचून प्राणी मुक्त झाला असें कसें म्हणतां येईल ? यास्तव अशास्त्रीय द्वैताचा बोधाच्यापूर्वीं व नंतर अशा दोन्ही कालीं अव्हेरच करावा. मात्र एकदा बोधसिद्धि हा व दुसऱ्यानें जीवन्मुक्तिसिद्धि हा उद्देश त्यांत असावा. सारांश जीवानें स्वसंकल्पानें निर्माण केलेलें अशास्त्रीय द्वैत सर्वथैव अनिष्ट असल्यामुळें सर्वदाच त्याज्य आहे. ॥५१॥

-'अहो पण जन्मादिरूप संसारापासून उद्विग्न झालेल्या साधकाला नित्य पुरुषार्थरूप विदेहमुक्ति मिळाली म्हणजे झालें. शरीर जिवंत असेपर्यंतच टिकणारी ही जीवन्मुक्ति घेऊन काय करावयाची आहे ?' अशी शंका घेऊन उत्तर-

**जीवन्मुक्तिरियं मा भूज्जन्माभावे त्वहं कृती ।**
**तर्हि जन्मापि तेऽस्त्वेव स्वर्गमात्रात्कृती भवान् ॥५२**

अन्वयार्थ- [इयं जीवन्मुक्ति: मा भूत्-] ही जीवन्मुक्ति मला न कां मिळेना ! [अहं तु जन्माभावे कृती इति चेत्-] मी तर पुन: जन्माला न आल्यानेंच

कृतकृत्य होईन, असें जर म्हणशील [तर्हि ते जन्म अपि अस्तु एव-] तर मग तुला जन्म सुद्धा असेना-त्यांत तुझें काय मोठें बिघडलें ? [यत: स्वर्गमात्रात् भवान् कृती भविष्यति-] कारण केवल स्वर्गप्राप्तीनेंहि तूं कृतकृत्य होशील !

प्रकाश:- या श्लोकाचा पूर्वार्ध प्रश्नरूप असून उत्तरार्ध प्रतिवचनरूप जरी आहे, तरी प्रश्नोत्तर सरळ नसून जशास तसें या न्यायानें प्रतिबन्दीरूप आहे. ऐहिक भोगांचा कंटाळा न आल्यामुळें साधकाला त्यांना सोडण्याचें मोठें कठिण वाटत असून, त्यांना न सोडतां सहज मिळत असला तर जन्ममरणध्वंसरूप मोक्ष पाहिजे आहे. म्हणजे पुण्यकर्में न करितां त्यांचें फल मागणाऱ्या किंवा पापकर्मे सतत करीत असूनहि त्यांच्या फलाला कंटाळणाऱ्या लोकांच्या वर्गातील हा प्रश्न विचारणारा आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण अशा मूर्खाला स्वामी म्हणतात:- जो ऐहिक भोगाकरितां जीवन्मुक्तीलाहि कंटाळला तो स्वर्गातील भोगांच्या लालसेनें विदेहमुक्तीला कंटाळणार नाहीं म्हणून कशावरून ? कारण अशा नराकृति पशूला जन्ममरणपरंपरेंतून सुटण्याची फारशी काळजी नसते. तर हे विषय सतत आपणांस भोगावयास कसे सांपडतील हीच त्याची उत्कट इच्छा असते. तस्मात् बाबारे, तूं आपला स्वर्गाचीच इच्छा कर ! या विदेहमुक्तीच्या कठिण मार्गात तरी उगीच कशाला येतोस !! ॥५२॥

-यावर तूं कदाचित् म्हणशील कीं-

**क्षयातिशयदोषेण स्वर्गो हेयो यदा तदा ।**
**स्वयं दोषतमात्माऽयं कामादि: किं न हीयते ॥५३**

अन्वयार्थ- [स्वर्ग: क्षयातिशयदोषेण हेय: इति यदा-] स्वर्ग हा क्षय व अतिशय या दोन दोषांनीं युक्त असल्यामुळें त्याज्य आहे असें जर म्हणशील [तदा अयं स्वयं दोषतमात्मा कामादि: न हीयते किं-] तर मूर्तिमंत दोषांचा राजा-आत्मा असा जो हा कामादि अनर्थसमूह तो त्याज्य ठरत नाहीं का ?

प्रकाश:- प्रत्यक्ष श्रुतीनेंच लौकिक कर्मजन्य पदार्थाच्या दृष्टान्तानें स्वर्ग हा, पुण्यक्षय झाला असतां, क्षीण होत असतो असें सांगितलें आहे व क्षय (नाश) हा एक मोठा दोष आहे अशी वैदिक व लौकिक समजूत आहे. यास्तव स्वर्गलोक क्षयरूपी महादोषानें दूषित असल्यामुळें त्याज्य आहे असें जर तूं म्हणशील, तर आम्ही तुला असें विचारतों कीं, काम हा साक्षात् दोषांचा राजा असतांना तुला ग्राह्य कसा वाटतो ? स्वर्गाप्रमाणें हाहि त्याज्य कां वाटत नाहीं ? अरेरे, प्राणी एकदा प्रबल इच्छेच्या अधीन झाला कीं, विवेकाला सर्वथैव मुकतो; हेंच खरें. ॥५३॥

-'वैराग्यादिकांना संपादन करून अत्यंत अनर्थाला कारण होणाऱ्या कामादिकांचा त्याग केलेला असल्यामुळें केवल ऐहिक भोगांच्याच उपयोगी असलेल्या कामादिकांचा स्वीकार करण्यास कोणता प्रत्यवाय आहे ?' म्हणून म्हणाल तर सांगतों -

**तत्त्वंबुद्ध्वाऽपि कामादीन्नि:शेषं न जहासि चेत्।**
**यथेष्टाचरणं ते स्यात्कर्मशास्त्रातिलंघिन: ॥५४**

अन्वयार्थ- [तत्त्वं बुद्ध्वा अपि-] तत्त्वज्ञान झाल्यावर सुद्धां [कामादीन् नि:शेषं न जहासि चेत्-] जर तूं कामादि दुष्ट विकारांना नि:शेष न टाकलेंस [कर्मशास्त्रातिलंघिन: ते-] तर विधि-निषेधरूप शास्त्राचें उल्लंघन करणाऱ्या तुझें [यथेष्टा-चरणं स्यात्-] मनसोक्त आचरण होऊं लागेल.

प्रकाश:- 'मला तत्त्वज्ञान झालें आहे' असा अभिमान वाटणें हें सुद्धां अनर्थकर आहे. परंतु जरी तुला तें झालें आहे असें वाटलें तरी सुद्धा तुला काम, क्रोध, लोभ इत्यादि दुष्ट वासनांचा त्याग केलाच पाहिजे. कारण तूं जर अभिमानानें तसें न केलेंस तर अर्थात् तुझें अत्यन्त निन्द्य आचरण होऊं लागेल. व

त्यामुळें तुला या व्यवहारांत कोणीहि मान देणार नाहीं. शिवाय अभिमानानें मनसोक्त आचरण करूं लागल्यामुळें तूं 'रोज संध्यावंदनादि कर्में करावीं' इत्यादि विधि व 'ब्राह्मणादि निरुपद्रवी सात्त्विक प्राण्यांना दु:ख देऊं नये' इत्यादि निषेध-वाक्यांचें उल्लंघन करशील; आणि त्यामुळेंहि तूं लोकांच्या तिरस्काराला पात्र होशील. तात्पर्य कामादिकांना नि:शेष टाकणें हेंच ज्ञानाचें लक्षण आहे. काम नसल्यामुळें तत्त्ववेत्याच्या कर्तव्यबुद्धीचा लोप होतो असें ''ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिन: नैवास्ति किंचित्कर्तव्यमस्ति चेन्न स तत्त्ववित्'' या श्लोकांत सांगितलें आहे. ॥५४॥

-मग यथेष्ट आचरण होईना, त्यांत काय दोष आहे ? उत्तर -

**बुद्धाद्वैतस्वतत्त्वस्य यथेष्टाचरणं यदि ।**
**शुनां तत्त्वदृशां चैव को भेदोऽशुचिभक्षणे ॥५५**

अन्वयार्थ- [बुद्धाद्वैतस्वतत्त्वस्य-] अद्वैत आत्मस्वरूपाचा ज्याला साक्षात्कार झाला आहे त्याचें [यदि यथेष्टाचरणं स्वात्-] जर यथेच्छ आचरण होऊं लागलें [तर्हि शुनां तत्त्वदृशां च-] तर मग कुत्रीं व तत्त्वज्ञानीं यांच्यामध्यें [अशुचिभक्षणे एव क: भेद: स्यात्-] अमंगल पदार्थ भक्षण करण्याविषयींच तेवढा भेद कोठून राहणार ?

प्रकाश:- ज्या धन्य पुरुषाला 'आत्माच अद्वितीय ब्रह्म आहे' असा साक्षात्कार होतो, त्याला 'तत्त्वज्ञानी' असें म्हणतात. शमदमादि पुण्यजनक सात्त्विक कर्मांच्या अनुष्ठानानेंच आत्मसाक्षात्कार होऊनहि ज्याचें पुढें मनसोक्त निंद्य आचरण होऊं लागतें, त्याला तत्त्वज्ञानी असें कोणी समजत नाहींत; तर हा कोणी शठशिरोमणी आहे अशी लोकांची भावना होते. तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीकरिता जसा साधक प्रयत्नानें पुण्याचरण करितो त्याचप्रमाणें सिद्धाचें तें तत्त्वज्ञानानंतरहि सहज होत असतें. ब्रह्मवेत्त्याचें यथेष्टाचरण संभवत नाहीं. ह्याविषयीं अनुभूति प्रकाशांत असें म्हटलें आहे ''किं च पुण्यरत: पूर्वं ज्ञानमाप्नोति नान्यथा । पश्चाच्च तद्वासनया पुण्यमेव करोत्यसौ ॥'' पण वस्तुस्थिति अशी असतांना जे ज्ञानाभिमानानें हवे तसे वागूं लागतात, ते संप्रदायानें प्राप्त होणाऱ्या ज्ञानानें संपन्न झालेले नसतात; आणि इतकेंच नव्हे तर, थोडेसे शास्त्रीय शब्द जरी त्यांना येत असले तरी ते संप्रदायशून्य व कामुक आहेत; असें नि:संशय समजावें. सारांश, जो ज्ञानानंतरहि यथेष्टाचरण करणार तो कुत्र्याप्रमाणें विष्ठाभक्षण करणार नाहीं म्हणून तरी कशावरून ? ॥५५॥

-'अशुचिभक्षणादिक केलें म्हणून तरी काय झालें ?' असें आग्रहानें विचारणाऱ्या वाद्याचा उपहास करितात-

**बोधात्पुरा मनोदोषमात्रात्क्लिश्नास्यथाधुना ।**
**अशेषलोकनिन्दा चेत्यहो ते बोधवैभवम् ॥५६**

अन्वयार्थ - [बोधात् पुरा मनोदोषमात्रात्क्लिश्नासि-] ज्ञान पूर्वीं कामादि मनोदोषांमुळे क्लेश भोगीत होतास [अथ अधुना तव अशेषलोकनिन्दा च-] आणि आतां तर तुझी सर्व लोकांत निन्दा होणार [अहो ते बोधवैभवम्-] वा:, केवढें हें तुझें बोधवैभव !

प्रकाश:- अरे मूर्खा, ज्ञानाच्या अभिमानानें जर तूं यथेष्टाचरण करूं लागलास तर तुला समाधान कसें मिळणार ? कारण बोधापूर्वीं तूं कामक्रोधादि दुष्ट मनोविकारांमुळें कष्टी होत होतास व आतां पुढें जिकडे तिकडे तुझी छी: थू: होणार म्हणून कष्टी होशील. मिळून तुझे कष्ट कांहीं केल्या सुटत नाहींत, ते नाहींतच ! मग त्या तुझ्या ज्ञानाचा उपयोग काय ? शास्त्रांत तर ज्ञानी पुरुष जगद्वंद्य होतो; शोकरहित असतो; निरतिशय समाधानाचा अनुभव घेत राहतो असें सांगितलेलें आढळतें; व तुझ्याकडे जों पहावें तों अगदीं निराळा प्रकार दिसतो. सारांश तुझ्या ह्या ज्ञानाची खरी योग्यता काय आहे हें यावरून सहज समजतें. ॥५६॥

-'तर मग काय करावें' म्हणून विचारशील तर सांगतों-

**विड्वराहादितुल्यत्वं मा कांक्षीस्तत्त्वविद्भवान् ।**
**सर्वधीदोषसंत्यागाल्लोकैः पूज्यस्व देववत् ।।५७**

**अन्वयार्थ- [भवान् तत्त्ववित् अस्ति-] आपण तत्त्ववेत्ते आहां ! [अतः त्वं विड्वराहादितुल्यत्वं मा काङ्क्षीः-] यास्तव बाबारे, विष्ठा खाणाऱ्या डुकरासारखा होण्याची इच्छा करूं नकोस; [किंतु सर्वधीदोषसंत्यागात्-] तर सर्व बुद्धिदोषांना झुगारून दे.[लोकैः देववत् पूज्यस्व-]व लोकांकडून देवाप्रमाणें पूजा करून घे.**

**प्रकाशः-** तत्त्ववेत्त्या पुरुषाची केवढी योग्यता असते हें सुचविण्याकरितां येथें भवान् इत्यादि आदरार्थी शब्दांचा प्रयोग केला आहे. तूं तत्त्ववेत्ता आहेस ना ? मग असें पशूंसारखें आचरण करण्याची उगीच कां इच्छा करितोस ! मनाच्या अधीन झाल्यानेंच प्राणी भिन्न भिन्न जातीचे झाले आहेत. यास्तव ज्याला स्वतःचा उद्धार कर्तव्य असेल त्यानें त्या दुष्ट मनाला स्वाधीन ठेवलें पाहिजे; हें लक्ष्यांत ठेव. आणि काम, क्रोध, मत्सर, द्वेष, असूया इत्यादि सर्व बुद्धिदोषांचा तिरस्कार कर. असें केल्यानें तुझें अंतःकरण अति निर्मल होईल व त्यामुळें तुझी मुद्राहि प्रसन्न राहील. व ह्या अवस्थेला तूं पोंचलास कीं तात्काल तुला सर्व प्राणी देवाप्रमाणें पूज्य मानूं लागतील. सारांश कामादि दुष्ट वृत्तींचा त्याग करणें हें परम फलद असल्यामुळें प्रत्येक मुमुक्षूनें त्यागाचा अंगीकार करावा. ।।५७।।

-आतां कामादिकांच्या त्यागाचा उपाय सांगतात-

**काम्यादिदोषदृष्ट्याद्याः कामादित्यागहेतवः ।**
**प्रसिद्धा मोक्षशास्त्रेषु तानन्विष्य सुखी भव ।।५८**

अन्वयार्थ- [काम्यादिदोषदृष्ट्याद्याः कामादित्यागहेतवः मोक्षशास्त्रेषु प्रसिद्धाः-] पुष्पमाला, चंदन इत्यादि काम्य पदार्थांचे ठिकाणीं दोषदृष्टि ठेवणें इत्यादि उपाय कामादिकांच्या त्यागाचे हेतु आहेत, असें मोक्षशास्त्रांत प्रसिद्ध आहे. [अतः तान् अन्विष्य सुखी भव-] यास्तव त्यांचा आश्रय करून सुखी हो.

**प्रकाशः-** कामनेचे जे विषय ते काम्य. हे अनेक आहेत. पण ते जरी सकृद्दर्शनीं फार रमणीय वाटले तरी, परिणामीं अति दुःखद आहेत. ते नित्य आहेत असें समजणें मोठें अनर्थावह आहे. इत्यादि गोष्टी शास्त्र व आचार्य यांच्या द्वारा समजून घेऊन मनामध्यें विषयस्मरण होतांच त्यांच्या दोषांविषयीं चिन्तन करूं लागावें. म्हणजे त्यांच्याविषयीं तीव्र इच्छा राहणार नाहीं. हाच एक त्याच्या त्यागाचा उपाय आहे. व वेदान्तांतहि याचाच निर्देश केलेला आहे. तस्मात् विचारवानानें या विषयदोषदर्शनरूप राजमान्य उपायाचें अवलंबन करून सुखी व्हावें. कोणत्याहि विषयाविषयीं दोषदृष्टि करणें; त्याच्याविषयीं मनांत तिटकारा बाळगणें व त्याच्या क्षणिक स्वरूपाचें चिन्तन करणें हे विषयत्यागाचे तीन उपाय आहेत-असें **हेतवः** या बहुवचनी पदानें सुचविलें आहे. काम्यादि या पदांतील आदि शब्दानें द्वेष्य (द्वेषास पात्र अशा) पदार्थांचेहि ग्रहण करावें. बृहद्योगवासिष्ठांत असें म्हटलें आहे: ''केशकज्जलधारिण्यो दुःस्पर्शा लोचनप्रियाः । दुष्कृताग्निशिखा नार्यो दहन्ति तृणवन्नरम्'' ।।५८।।

-कामादिक अनर्थावह असल्यामुळें त्याज्य आहेत, हें खरें; पण नुस्तें मनोराज्य कांहीं तसें नाहीं. तेव्हां त्याचा त्याग कशाला हवा ? अशी शंका घेऊन समाधान करितात-

**त्यज्यतामेष कामादिर्मनोराज्ये तु का क्षतिः ।**
**अशेषदोषबीजत्वात्क्षतिर्भगवंतरिता ।।५९**

अन्वयार्थ- [एषः कामादिः त्यज्यतां-] कामादि वृत्तिसमूह टाकावा. [किंतु मनोराज्ये का क्षतिः अस्ति-] पण केवल मनोराज्य करण्यास काय

प्रत्यवाय आहे ? [तस्य अशेषदोषबीजत्वात् भगवता क्षति: ईरिता-] मनोराज्य सर्व दोषांचें कारण असल्यामुळें स्वत: भगवानांनींच याविषयीं प्रत्यवाय सांगितला आहे.

प्रकाश:- मनोराज्यापासून कामादिकांप्रमाणें साक्षात् जरी अनर्थ उद्भवत नसला तरी तो परंपरेनें उद्भवतोच; तस्मात् मनोराज्य सुद्धां अनर्थकर आहे असें समजावें. ।।५९।।

-मनोराज्य परंपरेनें अनर्थाला कारण होतें, असें सांगणारें भगवद्वाक्यच येथें घेतात-

**ध्यायतो विषयान्पुंस: संगस्तेषूपजायते ।**
**संगात्संजायते काम: कामात्क्रोधोऽभिजायते ।।६०**

अन्वयार्थ - [विषयान् ध्यायत: पुंस:-] विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाची [तेषु संग: उपजायते-] त्यांच्याविषयीं आसक्ति उत्पन्न होते; [संगात् काम: संजायते-] विषयासक्तीपासून तृष्णा प्रबल होते [तथा कामात् क्रोध: अभिजायते-] व तृष्णेपासून क्रोधाचा आविर्भाव होतो.

प्रकाश:- विषयचिंतनानें कसे कसे अनर्थ होतात, तें या श्लोकांत क्रमानें सांगितलें आहे. ज्या विषयाचें ध्यान करावें तद्रूप मन होतें. तें तद्रूप झाल्यानें अर्थात् त्याला विषयासारखें रमणीय कांहींच न भासून त्याच्याविषयीं लालसा वाढते. विषयलालसेनें तद्विषयक कामना अनावर होते व प्राणी त्याच्या प्राप्तीविषयीं प्रयत्न करूं लागतो. पण प्रयत्न करूनहि जेव्हां त्याला अपयश येतें तेव्हां त्याच्या त्या स्थितीचें काय वर्णन करावें ? इष्ट विषयाची, प्रयत्न करूनहि प्राप्ति होत नाहीं, असें त्याला एकदा वाटलें की, त्याचें अंत:करण संतप्त होऊन जातें व काय करावें आणि काय न करावें याचेंहि त्याला भान राहत नाहीं. सारांश हें विषयचिन्तन प्राण्याला अनर्थपरंपरेंत लोटणारें असल्यामुळें विवेक्यानें त्याचा अव्हेर करावा. ।।६०।।

-'तर मग अशा ह्या अनर्थकर मनोराज्याचा त्याग कसा करितां येईल ?' उत्तर -

**शक्यं जेतुं मनोराज्यं निर्विकल्पसमाधित: ।**
**सुसंपाद: क्रमात्सोऽपि सविकल्पसमाधिना ।।६१**

अन्वयार्थ- [इदं मनोराज्यं निर्विकल्पसमाधित: जेतुं शक्यम्-] हें मनोराज्य निर्विकल्प समाधीच्या योगानें जिंकतां येतें. [स: अपि सविकल्पसमाधिना क्रमात् सुसंपाद: अस्ति-] व ह्या निर्विकल्प समाधीचें सुद्धां सविकल्प समाधीच्या योगानें क्रमाक्रमानें संपादन करितां येतें.

प्रकाश:- हें मनोराज्य जरी इतकें भयंकर असलें तरी त्याचा, निर्विकल्प नांवाच्या त्रिपुटीशून्य समाधीनें, निरोध होतो. कारण मन हेंहि एक ज्ञानसाधनच असल्यामुळें साध्यसाधनशून्य अशा त्या समाधींत त्याचा लय होणें साहजिक आहे. पण ही निर्विकल्प समाधि तरी कशी प्राप्त होणार ? असें कोणी विचारतील म्हणून स्वामी सांगतात कीं, ही दुसरी केवळ ध्यानादि त्रिपुटीनें युक्त असलेली समाधि सुद्धां यम, नियम, आसन इत्यादि क्रमानें सहज सिद्ध होते. तस्मात् निर्विकल्प साक्षात्काराकरितां प्रथम सविकल्पाचा आश्रय करावा. असा वेदान्ताचा उपदेश आहे. ।।६१।।

-'अहो पण, अष्टांगयोगाचा अभ्यास करणाऱ्या पुरुषालाच हा उपाय साध्य आहे. योगाभ्यास न करणाराला मनोराज्य कसें जिकितां येईल ?' उत्तर -

**बुद्धतत्त्वेन धीदोषशून्येनैकान्तवासिना ।**
**दीर्घं प्रणव मुच्चार्य मनोराज्यं विजीयते ।।६२**

अन्वयार्थ- [बुद्धतत्त्वेन-] ज्याला तत्त्वाचें ज्ञान झालें आहे [धीदोषशून्येन-] ज्याचे बुद्धिदोष सर्वथा नष्ट झाले आहेत, [एकान्तवासिना-] व एकान्तांत रहाण्याचें ज्याचें शील आहे अशा पुरुषाकडून [दीर्घं प्रणवं उच्चार्य-] दीर्घ प्रणवोच्चार करून [मनोराज्यं विजीयते-] मनोराज्य जिंकलें जातें.

प्रकाश:-केवळ तत्त्वाचा बोध झाल्यानें कांहीं एक लाभ होत नसून मनोराज्याचें सर्वथैव निवारण झालें असतांच परम लाभ होत असतो. आणि त्यामुळेंच परोक्षज्ञान व अपरोक्षज्ञान असे ज्ञानाचे दोन भाग झाले आहेत. पुष्कळ कालपर्यंत वेदान्तादिकाचें श्रवण झाल्यानें, कामक्रोधादिकांच्या फारसें अधीन न झाल्यानें व गुरु व शास्त्र यांवर दृढ विश्वास ठेविल्यानें, अधिकाऱ्याला 'आत्माच ब्रह्म आहे' असें नि:संशय वाटूं लागतें. पण या मनोराज्याचा त्यानें जय केलेला नसल्यामुळें त्याला त्याचा साक्षात्कार मात्र झालेला नसतो. यास्तव मनोविजय करण्या-करितां प्रत्येक साधकानें कामादिकांचा त्याग करून व एकांतांत बसून ब्रह्मतत्त्वाचें स्मरण करीत सहा किंवा द्वादश मात्रायुक्त प्रणवाचा उच्चार करावा. असें सतत करूं लागलें असतां हळू हळू मन स्वाधीन होऊं लागतें.तात्पर्य अष्टांग योग हा हठयोग असल्या मुळें कष्टसाध्य आहे. म्हणून साधकानें या भावनाविचाररूपी राजयोगाचा स्वीकार करावा. ॥६२॥

-पण मनोराज्याचें निवारण केल्यानें काय होतें ? उत्तर -

**जिते तस्मिन्वृत्तिशून्यं मनस्तिष्ठति मूकवत् ।**
**एतत्पदं वसिष्ठेन रामाय बहुधेरितम् ॥६३**

अन्वयार्थ - [तस्मिन् जिते सति-] त्या मनोराज्याचा जय झाला असतां [मन: मूकवत् वृत्तिशून्यं तिष्ठति-] मन मुक्याप्रमाणें व्यापारशून्य होऊन राहतें. [वसिष्ठेन रामाय एतत् एव पदं बहुधा ईरितम्-] श्रीवसिष्ठांनीं रामाला नि:संकल्प-अवस्थान हीच अवस्था पुष्कळ प्रकारें सांगितली आहे.

प्रकाश:- जसा एकादा मुका मनुष्य सर्व वाणीचा व्यापार सोडून शब्दशून्य होऊन राहतो, त्याचप्रमाणें ह्या अजेय मनाचा दृढ निश्चयानें जय केला असतां तें वृत्तिशून्य होऊन राहते. नाना प्रकारच्या क्षणिक वृत्ति हेंच मनाचें स्वरूप असल्यामुळें तें प्रतिबंधामुळें वृत्तिशून्य झालें कीं, त्याचें मनस्त्व (मनपणा) नष्ट होतें. हीच परम स्थिति होय. या अवस्थेलाच आत्मसाक्षात्कार असें म्हणतात. 'मनाचा अमनीभाव झाला कीं, मग द्वैताचा प्रत्यय येत नाहींसा होतो,' असें गौडपादाचार्यांनीं म्हटलें आहे. तसेंच वसिष्ठ महर्षींनींहि 'हें वृत्तिशून्य मनच परम पद होय' असें रामाला सांगितलें आहे. सारांश मनोजय केल्याने परम पदाचा लाभ होत असल्यामुळें त्याविषयीं प्रत्येक बुद्धिमानानें प्रयत्न करावा. ॥६३॥

-त्या वसिष्ठवचनांचाच उल्लेख करितात-

**दृश्यं नास्तीति बोधेन मनसो दृश्यमार्जनम् ।**
**संपन्नं चेत्तदुत्पन्ना परा निर्वाणनिर्वृति: ॥६४**

अन्वयार्थ- [दृश्यं नास्ति इति बोधेन-] 'दृश्य नाहीं' अशा ज्ञानानें [मनस: दृश्यमार्जनं संपन्नं चेत्-] मनापासून दृश्याचें जर निरसन केलें [तत् परा निर्वाणनिर्वृति: उत्पन्ना-] तर तें निरतिशय मोक्षसुख निष्पन्न झालें, असें जाणावें.

प्रकाश:- 'या जगांत आत्म्याहून अन्य कांहीं एक नाहीं.' "नेह नानास्ति किंचन" (बृ. ४-४-१९) व (का. ४-११) अशा अर्थाच्या अनेक श्रुति असल्यामुळें हें भासणारें दृश्य नाहींच असें निश्चयपूर्वक समजावें आणि एकदा अशी दृढ समजूत होऊन मनावरील दृश्यांविषयींचा संस्कार नष्ट झाला, कीं तें संकल्पराहित्य म्हणजेच परम गति किंवा निरतिशयानंदाची प्राप्ति होय. तस्मात् मनाला संकल्पशून्य करून सोडणें हाच मोक्ष नांवाचा चवथा पुरुषार्थ आहे; असें समजावें. ॥६४॥

-तसेंच-

**विचारितमलं शास्त्रं चिरमुद्ग्राहितं मिथ: ।**
**संत्यक्तवासनान्मौनादृते नास्त्युत्तमं पदम् ।।६५**

अन्वयार्थ- [शास्त्रं अलं विचारितं-] अद्वैत शास्त्राचा अतिशय विचार केला [मिथ: चिरं उद्ग्राहितं च-] व सहाध्यायांमध्यें परस्पर पुष्कळ कालपर्यंत त्याची चर्चा केली [तथापि संत्यक्तवासनात् मौनात् ऋते उत्तमं पदं नास्ति] तरी वासनाशून्य मौनाहून निराळें उत्तम नाहीं, असाच निश्चय झाला.

प्रकाश:- शास्त्रांचे स्वत: अध्ययन करणें व तीं दुसऱ्यांना शिकविणें अथवा परस्परांमध्येंच त्यांची चर्चा करणें हीं जरी ज्ञानसाधनें आहेत तरी तीं साक्षात् साधनें नव्हेत. कारण त्या सर्वांचें पर्यवसान वासनाशून्य मनामध्येंच होत नसतें. शिवाय ह्या पूर्वोक्त साधनांपैकी प्रत्येकाचें अनुष्ठान केलें तरच ज्ञान होईल असेंहि नाहीं. पण मौनाची स्थिती तशी नाहीं. त्याची ज्ञानाला अत्यन्त आवश्यकता असते. यास्तव वसिष्ठ रामचंद्राला म्हणतात-रामचंद्रा, गुरूंची शुश्रूषा करून कितीहि जरी शास्त्राध्ययन केलें किंवा परस्परांमध्यें त्याविषयीं प्रश्नप्रतिवचनें करून दीर्घकालपर्यंत जरी स्वत:चें समाधान करून घेतलें, तरी बाबारे ! समूल वासनात्याग ज्यामध्यें झाला आहे अशा मनावांचून उत्तम पद नाहीं. म्ह. ब्रह्म व आत्मा एक आहेत अशा 'सतत चिन्तनानें सर्व द्वैताचा व त्याच्या विषयींच्या वासनांचा निरोध झाल्यामुळें वृत्तिशून्य झालेलें मनच परमस्थान होय'. तात्पर्य मनोवृत्तींचा नि:शेष लय झाल्यावांचून आत्मसाक्षात्कार होणें शक्य नाहीं असें सिद्ध झालें. ।।६५।।

-'अहो पण, याप्रमाणें वृत्तिशून्य चित्त प्रारब्ध कर्मामुळें विक्षिप्त झालें असतां त्याच्या प्रतिकाराचा उपाय कोणता ?' म्हणून विचाराल तर सांगतों-

**विक्षिप्यते कदाचिद्धी: कर्मणा भोगदायिना ।**
**पुन: समाहिता सा स्यात्तदैवाभ्यासपाटवात् ।।६६**

अन्वयार्थ - [भोगदायिना कर्मणा धी: कदाचित् विक्षिप्यते-]भोग भोगावयास लावणाऱ्या प्रारब्धामुळें एखादे वेळीं चित्त विक्षिप्त होतें[किंतु अभ्यासपाटवात् सा पुन: तदा एव समाहिता स्यात्-] पण दीर्घकाळ अभ्यास झालेला असल्यामुळें पुन; तें तत्काल शांत होतें.

प्रकाश:- संचित व क्रियमाण कर्मानीं जरी ज्ञानी बद्ध होत नसला तरी देह असेपर्यंत त्याला प्रारब्ध सोडीत नाहीं. अथवा प्रारब्धाचा क्षय होईतों देह पडत नाहीं, असा वेदान्तसिद्धान्त आहे. म्हणून प्रारब्धामुळें जरी कदाचित् एकादे वेळीं मन विक्षिप्त झालें तरी त्यापासून, साधकानें त्याच्या निरोधाकरितां दीर्घ प्रयत्न केलेला असल्यामुळें, कांहीं एक हानि होत नाहीं. कारण तें भलभलत्या कल्पना करूं लागतें तोंच हा धीर पुरुष त्याला पुन: स्थिर करितो. सारांश चिरकाल अभ्यास केल्यामुळें त्याला मनाला हवें तेव्हां स्वाधीन करून घेतां येतें. ।।६६।।

-ज्याचें चित्त सदा विक्षेपरहित असतें त्याचें ब्रह्मज्ञत्वहि औपचारिक आहे, असें सांगतात-

**विक्षेपो यस्य नास्त्यस्य ब्रह्मवित्त्वं न मन्यते ।**
**ब्रह्मैवायमिति प्राहुर्मुनय: पारदर्शिन: ।।६७**

**अन्वयार्थ- [यस्य विक्षेप: नास्ति-] ज्याच्या मनाला विक्षेप होत नाहीं, [अस्य ब्रह्मवित्त्वं अपि न मन्यते-] तो ब्रह्मवेत्ता आहे असें म्हटलेलेंहि पण्डितांना मान्य होत नाहीं. [ किं तर्हि अयं ब्रह्म एव-] तर तो ब्रह्मच आहे [इति पारदर्शिन: मुनय: प्राहु:-] असें वेदान्तपारंगत सूक्ष्मदर्शी मुनी सांगतात.**

प्रकाश:- तर मग आतां ज्याच्या मनावर वृत्ति उठत नाहींत तो ब्रह्मवेत्ता (आत्मज्ञानी) असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे ? असें कोणी म्हणेल. पण तें बरोबर नाहीं. कारण अनुभवी पंडितांना व शास्त्राला या मनोवृत्तिशून्य प्राण्याला

ब्रह्मज्ञानीं असें म्हणणेंहि आवडत नाहीं. तर हा असला पुरुष ब्रह्मच आहे असें ते सर्वान्तर्यामी आत्म्याला साक्षात् पाहणारे मुनि सांगतात. -तस्मात् चित्ताला विक्षेपशून्य करणें म्हणजे ब्रह्मच होणें आहे. ।।६७।।

-याविषयीं वसिष्ठांच्या वचनांचा उल्लेख करितात-

**दर्शनादर्शने हित्वा स्वयं केवलरूपत: ।**
**यस्तिष्ठति स तु ब्रह्मन् ब्रह्म न ब्रह्मवित्स्वयम् ६८**

**अन्वयार्थ- [अयि ब्रह्मन्-] अरे ब्राह्मणा, [दर्शनादर्शने हित्वा-] ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही टाकून [य: स्वयं केवलरूपत: तिष्ठति-] जो कोणी पुरुष स्वत: केवलरूपानें राहतो [स: तु स्वयं ब्रह्म-] तो स्वत: ब्रह्मच होय. [न ब्रह्मवित्-] ब्रह्मवित् नव्हे.**

प्रकाश:- योगवासिष्ठांत एका ब्राह्मणाला उद्देशून कांहीं उपदेश चालला असतां तेथील हें वाक्य आहे. मी ब्रह्म जाणतों किंवा मी तें जाणत नाहीं अशा तऱ्हेच्या ज्या समजुती त्या सर्वथैव टाकून निर्वृत्तिक (वृत्तिशून्य) होऊन राहतो तो स्वत: (म्ह० निर्वृत्तिक अवस्थेचा साक्षी) ब्रह्मच आहे. त्याला व्यवहारांत ब्रह्मवित् म्हणून जें म्हणत असतात तें खरें नव्हे; कारण त्याला ब्रह्मवित् असें म्हटल्यानेंहि अद्वैतसिद्धान्ताची हानि होते. तस्मात् ब्रह्मवित्, ब्रह्मज्ञानी, आत्मज्ञानी, आत्मसाक्षात्कारवान् इत्यादि शब्द औपचारिक (गौण) आहेत असें समजावें. ।।६८।।

-याप्रमाणें सर्व द्वैताचें विवेचन करून आतां त्याचा उपसंहार करितात-

**जीवन्मुक्ते: परा काष्ठा जीवद्वैतविवर्जनात् ।**
**लभ्यतेऽसावतोऽत्रेदमीशद्वैताद्विवेचितम् ।।६९**

-इति पंचदश्यां द्वैतविवेक: ।।४

**अन्वयार्थ-** [असौ जीवन्मुक्ते: परा काष्ठा-] ही जीवन्मुक्तीची परमसीमा [जीवद्वैतविवर्जनात् लभ्यते-] जीवकृत प्रपंचाचा त्याग केल्यानें प्राप्त होते. [अत: अत्र इदं ईशद्वैतात् विवेचितम्] यास्तव या ठिकाणीं हें द्वैत ईशकृत द्वैताहून भिन्न करून दाखविलें.

प्रकाश:- स्वत: ब्रह्म होणें हीच जीवन्मुक्ताची श्रेष्ठ स्थिति आहे. पण ती प्राप्त होणें अतिशय कठिण असल्यामुळें साधकाला निरनिराळे उपाय योजावे लागतात. त्यांतीलच, जीवानें संकल्पानें निर्मिलेल्या ह्या शास्त्रीय व अशास्त्रीय द्वैताचा समूल नाश करणें, हा मुख्य आहे. कारण जीवद्वैताचा परिहार झाला कीं लागलेंच मन संस्कारशून्य झाल्यामुळें निर्वृत्तिक होतें व त्यामुळेंच या चतुर्थ प्रकरणांत जीवकृत द्वैत कोणतें व ईशकृत द्वैत कोणतें याचा विस्तृतपणें विचार केला आहे. आतां यामध्यें सांगितल्याप्रमाणें गुरु व शास्त्र यांच्या द्वारा स्वोद्धाराकरितां प्रयत्न करणें हें ज्याचें त्याचें काम आहे. ह्या चवथ्या प्रकरणांत गुरूपदेशावांचून साधकाला कृतकृत्य होतां येत नाहीं;असें सहाहि तात्पर्यबोधक लिंगावरून ठरतें. कारण ईश्वरोपदेशानेंच आम्हीं कृतकृत्य होऊं असें जर कोणी म्हटलें तर तो नि:शरीरी असल्यामुळें तसें होणें अशक्य आहे, असें त्याला सांगता येतें. शिवाय गुरु या पूज्य शब्दाला महत्त्व देण्याकरितांच भगवान् कृष्णानेंहि 'मी तुझा शिष्य आहें, मला उपदेश कर' असें अर्जुनानें म्हटल्यावरच, त्याला उपदेश करण्यास आरंभ केला आहे. यावरूनहि-ईश्वररूप गुरूंच्या द्वाराच उपदेश घ्यावा असें ठरतें. सारांश परंपरेला सोडल्यास हें आत्मज्ञान होणें दुरापास्त होत असल्यामुळें, ज्याला परम पुरुषार्थाची इच्छा असेल त्यानें योग्य संप्रदायाचा अंगीकार करून तदनुरूप प्रयत्न करावा म्हणजे तो कृतकृत्य होईलच होईल.

ह्या प्रकरणांत षट् लिंगें अशीं जाणावींत - ''ईश्वरेणापि जीवेन०'' हा उपक्रम व ''जीवन्मुक्ते: पराकाष्ठा'' हा उपसंहार.''अनिवृत्तेऽपीशसृष्टे०''

"प्रलये तन्निवृत्तो" येथें **अभ्यास** झालेला आहे. "मैवं मांसमयी काचित्" ह्या ठिकाणीं अपूर्वता "भाष्यवार्तिक-काराभ्याम्०" ह्या ठिकाणीं फल. "एतत्पदं वसिष्ठेन०" ह्या वरून **अर्थवाद** हें **लिंग स्पष्ट** होतें. "प्रलये तन्निवृत्तौ" येथें उपपत्तिहि सांगण्यांत आली आहे. ॥६९॥

॥ श्री: ॥

# ५ महावाक्यविवेक:

-ब्रह्मात्मैक्यज्ञान हेंच एक मुमुक्षूला मुक्ति मिळण्याचें साधन आहे. म्हणून तें सिद्ध होण्याकरितां ऋग्वेदादि चारी वेदांतील चार महावाक्यांचा अर्थ क्रमानें सांगण्याच्या इच्छेनें परम कृपाळु श्रीविद्यारण्यस्वामी प्रथम ऐतरेय आरण्यकस्थ 'प्रज्ञानं ब्रह्म' (ऐत ५-३) या महावाक्यांतील 'प्रज्ञान-' शब्दाचा अर्थ सांगतात-

**येनेक्षते शृणोतीदं जिघ्रति व्याकरोति च ।**
**स्वाद्वस्वादू विजानाति तत्प्रज्ञानमुदीरितम् ॥१**

अन्वयार्थ- [येन ईक्षते-] प्राणी ज्याच्या योगानें पाहतो; [येन श्रुणोति-] ज्याच्या योगानें ऐकतो, [येन जिघ्रति-] ज्याच्या योगानें वास घेतो येन व्याकरोति- ज्याच्या योगानें बोलतो [च येन स्वाद्वस्वादू विजानाति-] आणि ज्याच्या योगानें स्वादु व अस्वादु जाणतो [तत् प्रज्ञानं उदीरितम्-] तें प्रज्ञान असें सांगितलें आहे.

प्रकाश:- नेत्रद्वारा बाहेर जाणाऱ्या अंत:करणवृत्तींमध्यें प्रतिबिंबित झालेल्या चैतन्यानें प्राणी या सृष्टींतील सर्व रूपवान् पदार्थ पाहतो. तसेच श्रोत्रद्वारा बाहेर पडणाऱ्या अंत:करणवृत्तींतील चैतन्याभासानें सर्व शब्द ऐकतो, त्याचप्रमाणें घ्राणेंद्रियद्वारा सर्व गंधांचा वास घेतो. इत्यादिक वाक्यांची योजना करावी. तात्पर्य चक्षुरादिक इंद्रियें व अंत:करण यांच्या त्या त्या शक्तीवरून ज्ञान होणारें जें साक्षिचैतन्य तेंच प्रज्ञान होय. कारण पूर्वोक्त इंद्रियें व अंत:करण सुद्धां जड असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं कांहीं काल (केवळ स्वप्न व जाग्रदवस्थेंत) भासणारें चैतन्य मुख्य नव्हे; ही गोष्ट सिद्ध आहे. सूर्य जसा उदकांत प्रतिबिंबित होतो किंवा मुख आरशांत प्रतिबिंबित होतें, तसेंच हें चैतन्य प्रतिबिंबित होत असेल असें येथें समजूं नये. कारण सूर्यादि बिंबें व उदकादि उपाधि हीं जशीं मूर्त (साकार) व मर्यादित आहेत, त्याप्रमाणें हें चैतन्य मूर्त किंवा मर्यादित नाहीं. यास्तव 'अंत:करणरूप अति स्वच्छ व योग्य स्थळीं चैतन्याचा भास होतो' असा याचा अर्थ समजावा. प्रतिबिंब उपाधि असेपर्यंत असतें, तें बिंबाच्यासत्तेनेंच सत्तावान् होतें आणि तें व उपाधि यांचा जरी नाश झाला तरी बिंबाचा नाश होत नाहीं. ह्या तीन गोष्टी सुचविण्याकरितां प्रस्तुत शब्दाचा येथें उपयोग केलेला आहे. ॥१॥

-याप्रमाणें 'प्रज्ञान-' शब्दाचा अर्थ सांगून आता 'ब्रह्म-' शब्दाचा अर्थ सांगतात-